म. ग्रं. सं. वाचनालय, ठा
विषय नाटक
दा. क्र. 23668



IRBK-0123779

# दुहेरी आणि तीन एकांकिका

श्रीनिवास भणगे

वाचनालय
नाटक
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
स्वती मंदिर, सुभ. पथ,
न रोड, जिल्हा परि दे समोर
ठाणे
दुरध्वनी - ५४० ७८७
२३७८०
२८१५१८०

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे. तसें न केल्यास घटना नियम क्र. ५ (६) नुसार प्रतिदिनी २५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल. ( किमान दंड १ रुपया घेतला जाईल. )

16 AUG 1995
12 MAY 2003

( कृ. मा. पहा )
४००० –४–९५

# दुहेरी
## आणि
# तीन एकांकिका

श्रीनिवास भणगे

IRBK-0123779

मॅजेस्टिक प्रकाशन

दुहेरी आणि तीन एकांकिका
पहिली आवृत्ती
जानेवारी १९९०

© सौ. श्रद्धा भणगे

प्रकाशक
अशोक केशव कोठावळे
मॅजेस्टिक प्रकाशन
३१६, प्रसाद चेंबर्स
गिरगाव, मुंबई ४०० ००४

मुद्रक
रवींद्र केशव कोठावळे
ॐ मुद्रणालय
२५० अ, शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

मुखपृष्ठ : अरुण घाटे

मूल्य : २५ रुपये

---

सूचना : या चारही एकांकिकांचे प्रयोग करणे तसेच भाषान्तर वा रूपान्तर करणे यासाठी लेखी संमती घेणे आवश्यक आहे.

सौ. श्रद्धा भणगे
७, मध्वेंदु अपार्टमेंटस्,
१४, तपोभूमी सोसायटी, दत्तवाडी, पुणे ४११ ०३०.

राजदत्त या नावानं सिनेसृष्टीत
दिग्दर्शक म्हणून मानाचं स्थान भूषविणाऱ्या
माझ्या ' गैर-फिल्मी ' स्नेह्यास
प्रेमादरपूर्वक अर्पण

— श्री

# अनुक्रमणिका


१. धर्म / १
२. आगशी / २१
३. अंकुर / ३६
४. दुहेरी / ५५

म. ग्रं. सं., ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २३४५८ नों. दि. २६/४/९०
वि. ........ क्र. ........

[ पडदा उघडतो

रंगमंचावर संपूर्ण अंधार.

अचानकपणे पिस्तुलाचे दोन बार ऐकू येतात. पार्श्वसंगीताचा दूरवरून आल्यासारखा आवाज येतो. तो आवाज जवळ येतो आणि मग कर्कशपणे सगळ्या वातावरणात भरून राहतो. त्यातच पोलिसांच्या गाडीचा सायरन ऐकू येतो. मग सर्वत्र शांतता होते. क्षणकाल सगळं काही स्तब्ध झाल्यासारखं. त्यानंतर रंगमंच हलके हलके प्रकाशमान होतो.

एका प्रथितयश डॉक्टरच्या घरातला हा दिवाणखाना आहे. डॉक्टरांच्या व्यवसायाच्या काही खुणा दिवाणखान्यात आहेत. बाकीची सजावट उंची आणि डॉ. देशपांड्यांच्या स्वभावाला साजेशी शिस्तबद्ध.

रंगमंच प्रकाशित झाल्यावर असं दिसतं की इन्स्पेक्टर माने सिगरेट पेटवण्याच्या तयारीत आहेत. एका खुर्चीत डॉ. देशपांडे सुन्नसे बसले आहेत. कपडे फाटलेले, अवतार विस्कटलेला आणि पलीकडे एका प्रेतावर चादर घालून ठेवली आहे. दिवाणखान्यातली एक खुर्ची उलटी पडलेली आहे. टेबलावर एक ब्रीफकेस उघडी ठेवलेली आहे. ]

इन्स्पेक्टर : हं.... सगळा प्रकार माझ्या लक्षात आला आहे...पण तरीही डॉक्टरसाहेब, मला माझं कर्तव्य करायलाच पाहिजे...

देशपांडे : हो.. हो...आय ॲग्री...पण म्हणजे नेमकं काय करणार तुम्ही ?

इन्स्पेक्टर : आणखी थोडी चौकशी करणार... आणि नंतर तुम्हाला पोलीस-स्टेशनवर घेऊन जाणार.

देशपांडे : पण ..

इन्स्पेक्टर : या फॉर्मॅलिटीज आहेत. डोंट वरी...

देशपांडे : नाही. तुमच्या नियमाप्रमाणे सगळं काही होऊ द्या...मी आवश्यक ती मदत करीन.

इन्स्पेक्टर : थँक यू ! ( खिशातून डायरी आणि पेन काढतो ) या इसमाचं नाव काय म्हणालात ?

देशपांडे : नखाते... म्हणजे, हे आडनाव तेवढं माझ्या लक्षात आहे... नाव नाही आठवत.

इन्स्पेक्टर : हा पेशंट होता काय तुमचा ?

देशपांडे : हो .. माझ्याच हॉस्पिटलमध्ये होता... मी स्वतःच त्याच्या पोटावर शस्त्रक्रिया केली आहे. चांगलं मेजर ऑपरेशन होतं. थोडक्यात म्हणजे, मरणाच्या दारातून मी त्याला ओढून काढला आहे...या सगळ्या केसची सविस्तर माहिती हवी असेल तर हॉस्पिटलमध्ये कागदपत्र असतात.... तुम्हाला पाहायला मिळतील.

इन्स्पेक्टर : ते बघावेच लागतील ..पण मला असं सांगा की या ऑपरेशनला किती दिवस झाले ?

देशपांडे : साधारणपणे पहा, तीनएक महिने तरी होऊन गेले !

इन्स्पेक्टर : म्हणजे आत्ता हा माणूस, नखाते, अगदी व्यवस्थित बरा होता.

देशपांडे : अगदी दगडासारखा ठणठणीत !

इन्स्पेक्टर : त्याला आजच इथे येण्याचं काही कारण ? तुम्ही, बोलावलं वगैरे नव्हतं ना ?

देशपांडे : छेः हो ! म्हणजे साधारण महिन्यापूर्वी मी त्यांना निरोप पाठवला होता की ' भेटून जा ' म्हणून.

इन्स्पेक्टर : का ?

देशपांडे : नखात्यांनी माझी सगळी फी अजून दिलेली नाही. ( प्रेताकडे नजर टाकीत ) आणि आता तर ती शक्यताही राहिली नाही.

इन्स्पेक्टर : पण तुमचा कधी काही वादविवाद, भांडणं वगैरे झाल्याचं काही आठवतंय ?

देशपांडे : अहो मानेसाहेब, ज्या माणसाला मी यमाच्या दाढेखालूइ काढून आणला तो माणूस माझ्याशी कधी भांडेल का ! आणि अशा माझ्याच पेशंटशी मी भांडेन का ?

इन्स्पेक्टर : (किंचित हसून) तुमचं तर कुणाशी भांडण होणं बापजन्मी शक्य नाही.

देशपांडे : हे तर सगळ्यांनाच माहिताय... विशेषतः तुमच्यासारखे परिचित तर त्याबद्दल खात्रीच देतील.

इन्स्पेक्टर : म्हणूनच आश्चर्य वाटतं, की या माणसाचं तुमच्याकडे आत्ता, या वेळी, येण्याचं आणि तुमच्यावर हल्ला करण्याचं कारणच काय ? आणि तो हल्लाही साधा नाही, अगदी चाकू घेऊन, प्राणघातक हल्ला... !

देशपांडे : मला तर काही सुचतच नाही. आपला व्यवसाय सांभाळून जमेल तेवढं समाजकार्य करणारा माणूस मी. माझ्यावर हा प्रसंग यावा, आणि त्या प्रसंगाला तोंड देण्यासाठी मला एका जिवंत माणसावर, मीच जिवावरच्या दुखण्यातून वाचविलेल्या, माझ्याच एका पेशंटवर गोळी चालवण्याचा प्रसंग यावा !...ओह गॉड !! (डोकं गच्च दाबून धरतात)

इन्स्पेक्टर : डॉक्टरसाहेब, डोंट गेट अपसेट... तुमच्यावर जर जीवघेणा हल्लाच होत असेल, तर स्वसंरक्षणार्थ तुम्ही पिस्तूल चालवलंत त्यात काय चुकलं ?.... तुमच्या जागेवर दुसरा कोणीही असता तरी त्यानं हेच केलं असतं बाय द वे, हा हल्ला करण्यासाठी वापरलेला चाकू बरोबरच आणला होता ना त्यानं ?

देशपांडे : बरोबरच आणला असणार... कारण इथे, या खोलीत काही चाकूसारखी शस्त्रं मी ठेवीत नाही.

इन्स्पेक्टर : हा गृहस्थ, नखाते, साधारणपणे किती वाजता आला तुमच्याकडे ?

देशपांडे : साडेआठच्या सुमारास आला असेल. तुमचा दुपारी फोन आला होता की, 'मी नऊ सव्वानऊपर्यंत येतो' म्हणून... त्याप्रमाणे मी साडेसातच्या सुमारास हॉस्पिटलमधलं काम संपवलं आणि

घरी आलो ... म्हटलं वॉश घ्यावा आणि तुमची वाट पहात बसावं...म्हणून वॉश घेतला. तेवढयात हा आला...मला वाटलं तो उरलेलं बील द्यायला आला असेल...तेवढीच धनप्राप्ती... पण त्याचं काही पैसे देण्याचं चिन्ह दिसेना.

इन्स्पेक्टर : पण प्रत्यक्ष बोलणं काय झालं तुमचं ?

देशपांडे : अगदी फाल्तू हो...हवापाण्याच्या गप्पा... जाम बोअर झालो मी...त्याला कसा कटवावा याचाच विचार करीत होतो. बोलता बोलता मी त्याला सांगितलं की मी तुमची वाट पाहतोय आणि आता कोणत्याही क्षणी तुम्ही येऊन दाखल व्हाल. त्याबरोबर तो व्हायलंट झाला आणि त्यानं माझ्याशी भांडण उकरून काढलं....

इन्स्पेक्टर : कशावरून ?

देशपांडे : माझ्या हॉस्पिटलच्या बिलावरून....मी लोकांचे, म्हणजे पेशंटचे गळे कापतो....असं म्हणाला तो.

इन्स्पेक्टर : आणि हे, स्वतःच्या आजारपणाचं बील हातात पडल्यानंतर, थेट तीन महिन्यांनी त्याच्या लक्षात आलं.... !

देशपांडे : काहीतरी फाल्तू कारण हो ! एक तर त्याच्या डोक्यावर परिणाम झाला असावा किंवा त्याचा अन्य काहीतरी हेतू असावा.

इन्स्पेक्टर : दुसरा हेतू काय असणार ?...त्याची 'केस हिस्ट्री' मी संपूर्ण पाहिली नाही. पण आमच्या नेहमीच्या सराईत गुन्हेगारांपैकी नाही तो...

देशपांडे : नसणारच मानेसाहेब... अत्यंत सभ्य वाटायचा... म्हणूनच मी म्हटलं ना की त्याच्या डोक्यावर परिणाम झाला असावा, म्हणून ! उलट, तुम्हाला सांगतो, दवाखान्यात असताना माझा त्याच्यावर इतका विश्वास बसला होता की संध्याकाळी हॉस्पिटल-मधून निघताना तो सगळी कॅश जमा करून, नोटांची व्यवस्थित वर्गवारी करून, एका छोट्या कागदावर हिशेब लिहून माझ्या बॅगमध्ये तयार ठेवीत असे

इन्स्पेक्टर : थांबा...थांबा... हे सगळं सहज सोडून देण्यासारखं नाही...

मला परत एकदा सांगा ही काय भानगड आहे ते....

देशपांडे : *भानगड काही नाही. हॉस्पिटलमध्ये महिना महिना राहून पेशंट्स् कंटाळतात. त्यांना बाहेर पडता येत नाही आणि तिथे तसं* करमणुकीचं साधनही काही नसतं. अशा वेळी वेळ घालवण्यासाठी ते काहीतरी काम शोधतात. तुम्हाला माहितीय या माझ्या स्वतःच्या दवाखान्याबरोबर मी कॅन्सर रीसर्च फौंडेशनचंही काम पहातो. अनेक लोक, समाजोपयोगी संस्था या फौंडेशनला मदत करीत असतात. सरकारी मदतही असतेच. माझं नेहमीचं काम झालं की संध्याकाळी मी माझे स्वतःचे आणि या फौंडेशनचे असे पैसे मोजून त्यांचा हिशेब करीत असे. फौंडेशनचे पैसे वेगळे ठेवून, बँकेची स्लिपही भरून ठेवीत असे. म्हणजे मग दुसऱ्या दिवशी सकाळीच कारकून ते पैसे वेगवेगळ्या खात्यांवर भरून टाकायला मोकळा.. या कामात बराच वेळ जातो माझा. हा नखाते हॉस्पिटलमध्ये असाच कंटाळलेला होता. माझ्या या कामात मदत करण्याची इच्छा त्यानं व्यक्त केली. मीही विश्वासानं त्याच्याकडे ते काम सोपवलं आणि त्यानंही प्रामाणिकपणे केलं. त्याबद्दल माझी कधीही काहीही तक्रार नव्हती आणि आजही नाही .

इन्स्पेक्टर : आय सी ! साधारणपणे किती रक्कम असायची रोज ?

देशपांडे : असं नक्की कसं सांगता येणार ? दहाबारा हजार तर असायचेच... पण कधी कधी पन्नाससाठ हजारांच्याही पुढे जाते ही रक्कम...

इन्स्पेक्टर : आणि ही रक्कम असलेली बॅग रात्रभर तुमच्या घरात असते...

देशपांडे : अर्थात....बँका सकाळीच उघडतात...

इन्स्पेक्टर : आणि ही गोष्ट या नखातेला नक्की माहिती होती....

देशपांडे : जरी त्याला ते माहिती असलं (अचानक थांबतात आणि हलके हलके त्यांच्या डोक्यात प्रकाश पडतो) ओ आय सी .! तुम्हाला काय म्हणायचंय ते आत्ता माझ्या लक्षात यायला लागलंय...म्हणजे त्या पैशासाठी...

इन्स्पेक्टर : दुसरा काही मोटीव्हच नाही. तो परिस्थितीनं नाडला असणार

आणि इथे हे असं घबाड रोज असतं, हे त्याला निश्चितपणे माहिती होतं. कित्येकदा त्यानं स्वतःच्या हातानंच ठेवलेलं होतं....

देशपांडे : शक्य आहे मला तर काही कल्पनाच करता येत नाही....

इन्स्पेक्टर : माझ्या डोक्यावरचा ताण नाहीसा झाला

देशपांडे : म्हणजे ?

नन्स्पेक्टर : अहो, तुमच्यावर त्यानं चाकूहल्ला केला आणि स्वसंरक्षणार्थ तुम्ही तुमचं लायसन्स असलेलं पिस्तूल चालवलंत. त्यात त्याचा मृत्यू झाला ... इथपर्यंत सगळं ठीक आहे ... पण मुळात त्यानं तुमच्यावर हल्ला करण्याचं कारणच काय... ? त्याचा मोटीव्हच माझ्या टाळक्यात येत नव्हता ... तो तुमच्या या 'मदत' प्रकारावरून लक्षात आला ... पाहा, छोटे छोटे तपशील किती महत्त्वाचे असतात.

देशपांडे : मीही अगदी सहज बोलून गेलो. माझ्याही ध्यानात आलं नव्हतं.

इन्स्पेक्टर : त्याची फार मदत होणार आहे. नाऊ यू डोंट वरी....आय विल डू द रेस्ट....

देशपांडे : थँक यू, मानेसाहेब ...

इन्स्पेक्टर : अर्थात, तुम्हाला कोर्ट-कचेऱ्यांचा त्रास सहन करावा लागणारच.

देशपांडे : ते सहन करायलाच पाहिजे. एक जबाबदार नागरिक म्हणून ते माझं कर्तव्य आहे

इन्स्पेक्टर : थँक यू डॉक्टरसाहेब ... आता मी माझ्या कामाला सुरुवात करतो. आमची सगळी मंडळी थेट हवालदारांपासून फोटो-ग्राफरपर्यंत बाहेरच थांबलीयत.. त्यांना बोलावून घेतो. तोपर्यंत तुम्ही फ्रेश व्हा. कपडे वगैरे बदलून तयार रहा...तुम्हाला यायचंय माझ्याबरोबर...

देशपांडे : ओ येस....पण मानेसाहेब, हे जरी घडलं नसतं तरी तुम्ही आज माझ्याकडे येणारच होता....त्याचं काय झालं ?

इन्स्पेक्टर : ते आता सवडीनं बोलू...पोलीस वेल्फेअरचा कार्यक्रम असतो. त्यासाठी तुम्ही एक कॅन्सर तपासणीचं मोफत शिबिर घ्यावं, अशी

विनंती करायला मी आलो होतो....पण आता एवढ्यात ते काही जमणार नाही...पाहू आपण पुढे...यूप्लीज गेट रेडी...

देशपांडे : मानेसाहेब...

इन्स्पेक्टर : येस ?

(अचानकपणे डॉक्टर त्यांच्या जवळ जातात. त्यांचा हात हातात घेतात. आणि मनापासून त्यांना विचारतात— )

देशपांडे : या प्रकरणातून मी सहीसलामत सुटेन ना ?... एक पोलीस अधिकारी म्हणून नाही, पण एक मित्र म्हणून सांगा.... मला हे असं काही माहिती नाही हो . मी खरोखरीच घाबरून गेलोय...

इन्स्पेक्टर : (मित्रत्वाच्या जिव्हाळ्यानं) डोंट वरी देशपांडेसाहेब ... माझी स्वतःची शंभर टक्के खात्री आहे .... शिवाय आम्ही आहोतच ना पाठीशी...

देशपांडे : आर यू श्युअर ?

इन्स्पेक्टर : वन हंड्रेड ॲंड टेन परसेंट...मग तर झालं ?

(त्यांचा हात सोडून डॉक्टर पुढे येतात... त्यांचा स्वर कोरडा होतो.)

देशपांडे : मग खरी हकीकत वेगळी आहे.

इन्स्पेक्टर : व्हॉट डू यू मीन ?

देशपांडे : मला आणखी पाच मिनिटं द्या ... आणि शांतपणे बसा ... मी सांगतो तुम्हाला ..

इन्स्पेक्टर : पण... म्हणजे ?

देशपांडे : या नखातेला मीच बोलावलं होतं... तसं कशाला, सगळंच सविस्तर सांगतो...

(दिवे मंद होत होत विझतात...काळोख होतो.)

## ( प्रवेश दुसरा )

[ रंगमंच प्रकाशमान होतो.
मागच्या प्रवेशातला दिवाणखानाच समोर दिसतो. फक्त तूर्त तिथे कोणीही नाही. प्रेत नाही, ब्रीफ केस नाही आणि खुर्ची आपल्या जागेवर सरळ. थोड्याच वेळात दरवाज्यावरची बेल वाजते. आतून गंगाराम हा डॉक्टरसाहेबांचा नोकर येतो. हातातल्या घड्याळाकडे बघत तो दरवाजा उघडतो. दारात नखाते उभा. ]

गंगाराम : या...काय नाव आपलं ?

नखाते : नखाते...विनायक नखाते.

गंगाराम : बसा . डॉक्टरसाहेबांची अपॉइंटमेंट होती आत्ता ?

नखाते : हो.... म्हणजे त्यांनीच बोलावलं होतं...

गंगाराम : ( अचानकपणे, नकळत ) च्यायला... !

नखाते : अं ?

गंगाराम : सॉरी हं... तुमची अपॉइंटमेंट डॉक्टरसाहेबांच्या लक्षात नसणार. कारण आत्ताच त्यांनी मला सांगितलं की आत्ता थोड्या वेळात इथे फक्त इन्स्पेक्टर माने येणार आहेत...बाकी कुणी नाही... म्हणून मला घरी जायलासुद्धा सांगितलं त्यांनी .

नखाते : शक्य आहे...

गंगाराम : पण असं कधी होत नाही हो ! सगळ्या भेटीगाठी लिहिलेल्या असतात...आणि डॉक्टरसाहेबांच्या डोक्यात एखादी गोष्ट एकदा फिट बसली की जन्मभरासाठी कायम झाली म्हणून समजा. वीस–वीस वर्षांपूर्वीच्या पेशंटची नावं अगदी स्वतःच्या नावाइतकी सहज सांगतात...

नखाते : पण; मग मी थांबू ना ?...नाही, म्हणजे त्यांनीच निरोप पाठवला होता.

गंगाराम : इन्स्पेक्टर मान्यांशी तुमचा काही संबंध नाही ना ?

नखाते : पोलीस खात्यातल्या माणसाशी माझा अजूनपर्यंत तरी काही संबंध आला नाही.

गंगाराम : मग डॉक्टरसाहेबांचे पेशंट आहात ?

नखाते : होतो...तीनचार महिन्यांपूर्वी माझं एक फार मोठं ऑपरेशन झालं. डॉक्टरसाहेबांनी मला पुनर्जन्मच दिला म्हणा ना...त्यांचे माझ्यावर प्रचंड उपकार आहेत. त्यामुळे त्यांनी निरोप दिल्याबरोबर हजर झालो. (थोडासा लाजून) खरं तर त्यांचं संपूर्ण बीलही मी अजून दिलेलं नाही...पण या गृहस्थानं कधी त्याची आठवणदेखील दिली नाही .

गंगाराम : तुम्ही जन्मात कधी बील दिलं नाहीत ना, तरीदेखील ते आठवण करणार नाहीत ..नाही, म्हणजे, तुम्ही बील देणार नाही किंवा देऊ नका....असं काही मी सुचवीत नाही हं !...' डॉक्टरचं बील ठेवील तो एक मूर्ख '...असं रामदास स्वामींनी म्हणायचं राहून गेलंय....पण ते खरं आहे तर, मी तुम्हाला साहेबांच्या स्वभावाविषयी सांगत होतो...एकदम भोळाभाबडा स्वभाव... त्यात परत घरचं खाऊन लष्करच्या भाकऱ्या भाजायची हौस...

नखाते : त्याला समाजकार्य म्हणतात...

गंगाराम : लेबल काही पण लावा हो...प्रकार तोच...मग कुणीही ऊठसूठ या असल्या स्वभावाचा फायदा घेतो

नखाते : नाही, नाही साहेब. माझ्या मनात तसलं काही नाही. जरा सवड सापडताच मी डॉक्टरसाहेबांचं सगळं बील देणार आहे .. अगदी पैन् पै चुकती करणार आहे. अहो, डोंगराएवढे उपकार आहेत त्यांचे माझ्यावर...त्यांनी वाचवलं नसतं तर माझी पोरंबाळं आज उघड्यावर पडली असती.

गंगाराम : आर्रर्रर्र ! ..तुम्ही गैरसमज करून घेतला. मी ते वाक्य तुम्हाला नाही म्हणालो एकंदर मनुष्यस्वभावाचं सांगत होतो...सॉरी हं...

नखाते : पण त्या निमित्तानं मी माझ्यावरच्या ऋणाचं ओझं निदान

तुमच्यासमोर बोलून तरी दाखवलं....

गंगाराम : ते काही नाही, तुम्हाला सांगतो नखातेसाहेब. माणसाला स्वतःचा संसार असला ना की आपोआप व्यवहाराच्या चार गोष्टी त्याला यायला लागतात...

नखाते : म्हणजे साहेबांनी...?

गंगाराम : छ्यः !...एकदम कडक मारुती !...दिवसरात्र काम अन् काम... घरदार कुछ नाही...

नखाते : देवमाणूस आहे....

गंगाराम : पण त्यामुळे आमच्यासारख्या चाकरमान्यांची पंचाईत होते ना !.. अहो, साहेबांना संसार नाही. त्यामुळे ते सतत कामात.. त्यांच्यामुळे आम्ही सतत कामात... पण आम्हाला संसार आहे...( याच वेळी डॉक्टर देशपांडे आतून येतात. ) आता बघा, मी खरं म्हणजे मघाशीच घरी जाऊन जुना व्हायला पाहिजे.. पण अजून इथेच मुरतोय....

देशपांडे : म्हणूनच आता, गंगारामपंत, तुम्ही गेलात तरी चालेल .. ( डॉक्टरांचा आवाज ऐकताच नखाते ताडकन् उभा राहतो. गंगाराम चरकतो ..एकदम अजीजीनं म्हणतो...)

गंगाराम : नाही म्हणजे साहेब...मला असं म्हणायचं होतं...

देशपांडे : तुम्हाला काय म्हणायचं होतं, ते माझ्या लक्षात आलंय... तुम्हाला मी आज ओळखतोय का ? . पण आज तुमच्या भाषेत तुम्ही माझ्या स्वभावाचं जे विश्लेषण केलंत, त्याला तोड नाही. बसा नखाते...

गंगाराम : म्हणजे साहेब ?

देशपांडे : नखात्यांनी दरवाज्यावरची बेल वाजवली तेव्हाच मी दार उघडायला निघालो होतो म्हटलं तुम्ही केव्हाच घरी जाऊन जुने झालेले असणार पण तुम्ही इथेच मुरत होतात....! तुम्ही दार उघडल्यावर म्हटलं बघू या, तुम्ही पाहुण्यांचं स्वागत कसं करता ते म्हणून दोन मिनिटं आतच थांबलो. नंतर लक्षात आलं की तुम्ही फारच 'करमणूकप्रधान' बोलताय ...त्यामुळे आणखी

थोडं ऐकलं...

गंगाराम : पण साहेब...मी...म्हणजे वेडंवाकडं काही....

देशपांडे : (हसत) गंगाराम, तुमच्यासारखीच तुमची ही मतं मला नवी नाहीत !...आणि मला व्यवहार पाहता आला नाही, यात काही खोटं नाही खरं सांगायचं तर तुम्ही बोललात त्यातलं अक्षरन् अक्षर खरं आहे....

गंगाराम : साहेब, मला वाटतं...बराच उशीर झालाय...मी आता...

देशपांडे : हो...तुम्ही आता घरी जा...उद्या सकाळी इथून प्रथम बँकेत जा आणि नंतर तसेच हॉस्पिटलमध्ये एक चक्कर टाका....उद्या ऑपरेशन्स आहेत, त्यामुळे बाकीचे लोक बिझी असतील...डॉ. मोटींच्याकडे काही रिपोर्ट्स पाठवायचे आहेत. ते तुम्हालाच न्यावे लागतील.

गंगाराम : बघा !...मी आत्ता थांबलो नसतो, तर हा निरोप राहिलाच असता...

देशपांडे : तर !...तुमच्या समयसूचकतेचं कौतुक करावं तेवढं कमीच ! आत्ता लगेच घरी गेलात तर बायकोसुद्धा त्याचं कौतुक करील... पण थोडा उशीर केलात तर उद्या पेशंट म्हणूनच यावं लागेल...

गंगाराम : खरं आहे...येतो मी ..बरंय नखातेसाहेब ..
(गंगाराम गडबडीने बाहेर जातो. डॉक्टर दरवाजा लावून घेतात.)

नखाते : साहेब, आपण आज मला बोलावलंत...म्हणून....

देशपांडे : हो माझं एक काम आहे तुमच्याकडे ..

नखाते : सांगा साहेब तुमचं एखादं तरी काम करण्याची संधी मिळावी हीच इच्छा आहे माझी अवश्य सांगा...

देशपांडे : सांगतो ना...आता आपल्याजवळ वेळही फार थोडा आहे. कारण इन्स्पेक्टर माने त्यांच्या काहीतरी कामासाठी माझ्याकडे आत्ता येणार आहेत तेव्हा आपण मुद्द्याकडेच येऊ...

नखाते : माझ्यासारख्या माणसाकडे आपलं काय काम असणार, याचा अंदाजच मला येत नाही...

देशपांडे : अंदाज करीत बसू नका....मी सांगतोच आहे ... नखाते, तुम्हाला जुन्यापुराण्या पोथ्या, जुनाट ऐतिहासिक वस्तू, हत्यारं वगैरे गोळा करण्याचा नाद आहे.

नखाते : साहेब...आपल्याला कसं काय...?

देशपांडे : मला कसं समजलं ते मी नंतर सांगतो... पण असा शौक तुम्हाला आहे, हे खरं ना?

नखाते : (सुस्कारून) खरं सांगायचं म्हणजे हा नाद मला होता...मी साताऱ्याला होतो तेव्हा होता. जिवापाड श्रम करून, प्रसंगी पोटाला चिमटा घेऊन मी हा उद्योग करीत असे. साताऱ्याचं माझं घर म्हणजे, फार मोठं नसलं तरी, एक छोटंसं ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयच बनून गेलं होतं... अनेक लोक ते पाहायला यायचे...विशेषतः इतिहासप्रेमी...पण पुढं ते सगळं संपलं...

देशपांडे : म्हणजे ?

नखाते : मला ते परवडेना...इतिहासापेक्षा वर्तमानातली पोटाची चिंता जास्त निकडीची ठरली... कोणाच्याही मदतीशिवाय मी ते काम करीत होतो...तसा मदत मिळवण्याचा मी प्रयत्न केला होता... सरकारी मदत मिळण्याची शक्यताही निर्माण झाली होती. पण त्यातला पाऊण भाग सरकारी कर्मचाऱ्यांची गरिबी हटवायला द्यावा लागणार होता. उरलेल्या पाव हिश्श्यानं तसा काही फरक पडला नसता. म्हणून मग मी सरकारी मदतीचा नाद सोडला... सामान्य माणसांना जुन्या दगडधोंड्यात काही फारसा इंटरेस्ट नव्हता आणि एकट्याच्या जिवावर हे काम करणं मला अशक्य झालं होतं.. एक दिवशी जेव्हा घरात चूल पेटणार नाही, अशी वेळ आली त्या दिवशी मी हा धंदा संपवला. एका क्षणात निर्णय घेतला आणि त्या सगळ्या वस्तूंत गुंतलेला माझा जीव काढून घेतला. मोकळा झालो.

देशपांडे : आणि मग ते सगळं भांडार ?

नखाते : इतिहास संशोधन मंडळाला दिलं आणि आंघोळ केली...परत कधी त्याविषयीचा विचारही मनात येऊ दिला नाही...पुढे

बदल्या झाल्या. ते गाव सुटलं आणि मग त्या प्रकाराची आणि माझी नाळ तुटली... जगावेगळा शौक करून मोठा होण्याचा माझा बेत होता...परिस्थितीनं सगळ्या बाजूंनी झोडपून मला जागेवर आणलं...त्यावेळी जगण्यात एक कैफ होता. तो कैफ, ती धुंदी गेली. पण चार घास खाऊन सुखानं जगता यायला लागलं...

देशपांडे : आय ॲम सो सॉरी...

नखाते : जाऊ द्या डॉक्टरसाहेब... आता मला त्याचं अजिबात वाईट वाटत नाही. तुम्हाला खरं वाटणार नाही, पण त्या काळात मी जो माज केलाय त्याला तोड नाही...

देशपांडे : नसणारच.. आपल्या आवडत्या कामाचा कैफ काही वेगळाच असतो...

नखाते : आवडत्या कामाच्या निमित्तानं जे काही वाटेत आलं ते सगळं मी भोगलं.... आपण काहीतरी जगावेगळं करतो आहोत या धुंदीत सर्वसामान्यांच्या वागण्याचे सगळे नियम मी बाजूला टाकले.... आणखी स्पष्ट करून कशाला सांगू?....थोडक्यात म्हणजे, माझ्या आचार– विचारावर आणि विकारावरही, कोणताही धरबंध उरला नव्हता...सगळा स्वैराचारच होता.

देशपांडे : असं ?

नखाते : आपल्यापासून काय लपवायचं ?...पण ते संपलं आणि माझा पुनर्जन्म झाला. एक अगदी सामान्यातला सामान्य, असा पाप-भीरू माणूस झालो मी. तसा मी दोनदा मरून जन्मलेला माणूस आहे, डॉक्टरसाहेब! त्यावेळी स्वैराचार संपून माझा पुनर्जन्म झाला आणि दुसरा जन्म आपण दिलात...जिवावरच्या दुखण्यातून वाचवून

देशपांडे : मी माझं काम केलं ...एकही काम अपूर्ण ठेवायचं नाही, त्याकडे दुर्लक्ष करायचं नाही ..हे माझ्या जीवनाचं बोधवाक्यच आहे म्हणा ना....

नखाते : हा आपला विनय आहे...पण आज आपण मला...

देशपांडे : हो...सांगतो. तुम्हाला जसा होता....तसा थोडाफार नाद मला पण आहे. तुमच्यासारखं सर्वस्व झोकून देणारा नाही. पण आपले उद्योग सांभाळून, जाता-येता, जमल्यास मीही काही गोष्टी जमा करतो त्या जुन्या वस्तू, त्या वापरण्याच्या पद्धती यात मलाही थोडा रस आहे.

नखाते : ( आश्चर्यानं ) काय सांगताय काय डॉक्टर...!

देशपांडे : म्हणजे माझा अभ्यास नाही हं किंवा त्यातलं काही कळतं, अशातला पण भाग नाही केवळ छंद...

नखाते : फार बरं वाटलं...मला वाटलं मी एकटाच वेडा होतो...

देशपांडे : नाही...मी वेडा नाही... मी अगदी विचारपूर्वक वागणारा, शिस्तबद्ध माणूस आहे मी वेडा नाही, हे आता थोड्याच वेळात तुमच्या लक्षात येईल.

नखाते : म्हणजे ?...मी समजलो नाही ..

देशपांडे : सांगतो. परवा मी भोरला गेलो होतो. जुन्या बाजारासारखा बाजार होता. तिथे चक्कर टाकता टाकता मला ही एक वस्तू मिळाली.

[ टेबलाजवळ जातात. टेबलाच्या ड्रॉवरमधून एक लाकडी मुठीचा, धारदार पात्याचा, पण जुनाट वाटणारा चाकू काढतात. हा चाकू त्यांनी मोठ्याशा नॅपकिनमध्ये गुंडाळलेला आहे. त्यामुळे डॉक्टरांच्या बोटांचे ठसे त्यावर उमटण्याचं काही कारण नाही. तो तसाच नखातेपुढे ठेवला जातो. नखाते घाईघाईनं तो उघडतो .. हाताळतो. ]

हा चाकू किंवा सुरी किंवा जे काही शस्त्र आहे, ते पेशवाईच्या थोडं आधीच्या काळातलं आहे, असं मला त्या विक्रेत्यानं सांगितलं...हा ऐतिहासिक संदर्भ मिळताच मी चमकलो आणि चक्क एकशे पस्तीस रुपये मोजून विकत घेतलं...

[ यावेळी नखाते, तो चाकू अतिशय निरखून, काळजीपूर्वक न्याहाळतो आहे. ]

...मला माझ्या खरेदीविषयी तुमचं मत हवं आहे. ही वस्तू खरोखरीच इतकी जुनी आहे का ?...असल्यास त्याचा काळ कोणता असेल ?

(नखाते हसतो) ...कां ? हसलात ?

नखाते : डॉक्टरसाहेब, आपल्याला साफ फसवलंय...हा चाकू ऐतिहासिक वगैरे काही नाही फक्त जुनाट आहे...या पद्धतीची शस्त्र पेशवाईच्या आधी कशी असतील ?...आणि हे चकचकीत पातं तुम्ही पाहिलंत का ? हे चक्क जर्मन आहे.

देशपांडे : काय सांगताय .. ?

नखाते : अहो, एकशे पस्तीस रुपये मोजून तुम्ही फक्त दहा–पंधरा वर्षापूर्वीची वस्तू घेतलीत.. फार तर पंचवीस वर्षांपूर्वीची...

देशपांडे : खलास...या असल्या नादात मी आत्तापर्यंत किती पैशांचा चुराडा केलाय राम जाणे !

नखाते : ऐतिहासिक वस्तू शोधीत फिरणारा माणूस दिसला ना की रस्त्यावरचा चोरही त्याला फसवतो. कालची वस्तू एकदम शिवाजी महाराजांच्या काळातली होते ! खरं सांगू का, त्याला ती एक दृष्टीच असावी लागते...

देशपांडे : बरोबर आहे तुमचं...म्हणून तर मी तुम्हाला बोलावलं.... एक्स्पर्ट्स् कॉमेंट्स फार महत्त्वाचे.... पण काय हो, हे शस्त्र कशासाठी वापरीत असावेत ?

नखाते : बहुधा कोथळा बाहेर काढण्यासाठी...

देशपांडे : माय गॉड ! . आणि मग ते वापरतात तरी कसं ?

नखाते : मला निश्चित माहिती नाही. पण मला वाटतं, हे घट्ट पकडून पोटात खुपसतात आणि मग हे असं फिरवतात. म्हणजे मग सगळे कनेक्शन्स तुटून, तुमच्यासारख्या सर्जनलाही फारसं काही करता येत नाही....

[ यावेळी चाकूची मूठ घट्ट पकडून नखाते त्यांना चाकू पोटात खुपसण्याची आणि मग फिरवण्याची कृती करून दाखवतो. ]

देशपांडे : मोठं भीषण आहे... !

[डॉक्टर डोक्यावरून हात फिरवतात... केस विस्कटून टाकतात. त्यांच्या बोलण्याशी ही कृती इतकी संलग्न आहे की त्यांनी आपले केस चांगलेच विस्कटून टाकले आहेत, हे नखातेच्या लक्षातही येत नाही ]

नखाते : ध्या... द्या ठेवून... (तो चाकू देतो)

देशपांडे : ठेवा ना टेबलावर...

[तो चाकू टेबलावर ठेवतो... देशपांडे नॅपकीन उचलतात आणि नीट घडी करून टेबलाच्या ड्रॉवरमध्ये ठेवतात. ]

नखाते : पण डॉक्टरसाहेब, माझ्या या आवडीविषयी आपल्याला कुणी सांगितलं, हे आपण नाही सांगितलंत ?

देशपांडे : सुलोचना देशपांडेनं...

नखाते : सुलोचना देशपांडे ? .... (विचार करीत) काही लक्षात येत ना ी... आपल्या कोण लागतात ?

देशपांडे : सख्खी बहीण.

नखाते : पण त्यांचा आणि माझा संबंध कसा आणि कुठे आला ?

देशपांडे : तसं तुम्हाला आठवणार नाही. [हे बोलता बोलता डॉक्टर ब्रीफकेस काढतात आणि टेबलावर ठेवतात ... तिचं कुलूप उघडतात.. त्यातला नोटांचा गठ्ठा काढून उगाचच पाहतात... परत निष्काळजीपणे आत टाकतात... केस उघडीच ठेवतात ] सुलोचना देशपांडे हे नाव तुम्हाला आठवणार नाही... सातारला तुमच्याच वाड्यात राहणारे म्हात्रे आठवतात ?

नखाते : हो....खालच्या मजल्यावरच म्हात्र्यांचं बिऱ्हाड होतं.

देशपांडे : बरोबर आहे...खालच्या मजल्यावर म्हात्रे, वरच्या मजल्यावर तुम्ही आणि तिसऱ्या मजल्यावर अगदी एकांताच्या जागी तुमची ही ऐतिहासिक सामानाची मोठी खोली होती.

नखाते : अरेच्या !... हा सगळा भूगोल तुम्हाला कसा काय माहिती ?

देशपांडे : कारण मी तिथे आलो होतो.

नखाते : असं!...कधी?

देशपांडे : दहाबारा वर्षांचा असताना....आता तुम्हाला कदाचित आठवेल ...म्हात्र्यांच्या घरी मे महिन्याच्या सुट्टीत आलेली सुलू नावाची सतराअठरा वर्षांची मुलगी आठवते का पाहा...तिच्याबरोबर तिचा भाऊ पण होता...भावाला तुमच्या या शौकात काही रस नव्हता. पण सुलूला मात्र जुन्या वस्तूंमध्ये अतिशय रस होता. बराच वेळ ती तुमच्या त्या खोलीतच असायची...

[ डॉक्टरांचं हे बोलणं ऐकता ऐकता नखाते कापायला लाग-लाय....त्याचा चेहरा घामानं डबडबला आहे...कसाबसा तो उठून उभा राहतो. ]

नखाते : म्हणजे डॉक्टरसाहेब....ती...म्हात्र्यांच्या घरची पाहुणी...सुलू... म्हणजे...

देशपांडे : माझी सख्खी थोरली बहीण....आणि तो भाऊ म्हणजे मी...

नखाते : पण डॉक्टर...शप्पथ! ... तो एक अपघात होता...क्षणिक मोह....

देशपांडे : शट् अप! ... बलात्कार हा अपघात असूच शकत नाही...तो अतिशय योजनापूर्वक केलेला अत्याचारच होता ... आणि क्षणिक मोहाच्या गोष्टी मला सांगू नका. तुम्ही मघाशी वर्णन केलेल्या स्वैराचाराचाच तो एक भाग होता....

[ नखाते नखशिखान्त हादरतो...पटकन् डॉक्टरांच्या पायावर कोसळतो. ]

नखाते : मला क्षमा करा डॉक्टरसाहेब... मला क्षमा करा...माझ्या हातून अघोरी कृत्य घडलं...इतक्या वर्षांनंतरही मी ते विसरू शकत नाही...मला पश्चात्ताप झालाय हो...

देशपांडे : नाही...अपराधाला क्षमा नाही! माझ्या बहिणीनं नंतर आत्म-हत्या केली. तिच्या आत्महत्येचं कारण तिनं मला सांगितलं होतं...फक्त मला...स्त्री–पुरुषसंबंधाविषयीच माझ्या मनात घृणा निर्माण झाली....मी अविवाहित राहिलो...फक्त एकच ध्येय डोळ्यांसमोर ठेवून की कधी ना कधी तुझी आणि माझी गाठ

देशपांडे : मोठं भीषण आहे... !

[ डॉक्टर डोक्यावरून हात फिरवतात...केस विस्कटून टाकतात. त्यांच्या बोलण्याशी ही कृती इतकी संलग्न आहे की त्यांनी आपले केस चांगलेच विस्कटून टाकले आहेत, हे नखातेच्या लक्षातही येत नाही ]

नखाते : घ्या...द्या ठेवून... (तो चाकू देतो)

देशपांडे : ठेवा ना टेबलावर...

[ तो चाकू टेबलावर ठेवतो...देशपांडे नॅपकीन उचलतात आणि नीट घडी करून टेबलाच्या ड्रॉवरमध्ये ठेवतात. ]

नखाते : पण डॉक्टरसाहेब, माझ्या या आवडीविषयी आपल्याला कुणी सांगितलं, हे आपण नाही सांगितलंत ?

देशपांडे : सुलोचना देशपांडेनं...

नखाते : सुलोचना देशपांडे ? .... (विचार करीत) काही लक्षात येत ना ी...आपल्या कोण लागतात ?

देशपांडे : सख्खी बहीण.

नखाते : पण त्यांचा आणि माझा संबंध कसा आणि कुठे आला ?

देशपांडे : तसं तुम्हाला आठवणार नाही. [ हे बोलता बोलता डॉक्टर ब्रीफकेस काढतात आणि टेबलावर ठेवतात ... तिचं कुलूप उघडतात.. त्यातला नोटांचा गठ्ठा काढून उगाचच पाहतात... परत निष्काळजीपणे आत टाकतात... केस उघडीच ठेवतात ] सुलोचना देशपांडे हे नाव तुम्हाला आठवणार नाही...सातारला तुमच्याच वाड्यात राहणारे म्हात्रे आठवतात ?

नखाते : हो....खालच्या मजल्यावरच म्हात्र्यांचं बिऱ्हाड होतं.

देशपांडे : बरोबर आहे...खालच्या मजल्यावर म्हात्रे, वरच्या मजल्यावर तुम्ही आणि तिसऱ्या मजल्यावर अगदी एकांताच्या जागी तुमची ही ऐतिहासिक सामानाची मोठी खोली होती.

नखाते : अरेच्या !... हा सगळा भूगोल तुम्हाला कसा काय माहिती ?

देशपांडे : कारण मी तिथे आलो होतो.

नखाते : असं!...कधी?

देशपांडे : दहाबारा वर्षांचा असताना....आता तुम्हाला कदाचित आठवेल ...म्हात्र्यांच्या घरी मे महिन्याच्या सुट्टीत आलेली सुलू नावाची सतराअठरा वर्षांची मुलगी आठवते का पाहा...तिच्याबरोबर तिचा भाऊ पण होता...भावाला तुमच्या या शौकात काही रस नव्हता. पण सुलूला मात्र जुन्या वस्तूंमध्ये अतिशय रस होता. बराच वेळ ती तुमच्या त्या खोलीतच असायची...

[ डॉक्टरांचं हे बोलणं ऐकता ऐकता नखाते कापायला लाग-लाय....त्याचा चेहरा घामानं डबडबला आहे...कसाबसा तो उठून उभा राहतो. ]

नखाते : म्हणजे डॉक्टरसाहेब....ती...म्हात्र्यांच्या घरची पाहुणी...सुलू... म्हणजे...

देशपांडे : माझी सख्खी थोरली बहीण....आणि तो भाऊ म्हणजे मी...

नखाते : पण डॉक्टर...शप्पथ! ... तो एक अपघात होता...क्षणिक मोह....

देशपांडे : शट् अप! ... बलात्कार हा अपघात असूच शकत नाही...तो अतिशय योजनापूर्वक केलेला अत्याचारच होता ... आणि क्षणिक मोहाच्या गोष्टी मला सांगू नका. तुम्ही मघाशी वर्णन केलेल्या स्वैराचाराचाच तो एक भाग होता....

[ नखाते नखशिखान्त हादरतो...पटकन् डॉक्टरांच्या पायावर कोसळतो. ]

नखाते : मला क्षमा करा डॉक्टरसाहेब... मला क्षमा करा...माझ्या हातून अघोरी कृत्य घडलं...इतक्या वर्षांनंतरही मी ते विसरू शकत नाही...मला पश्चात्ताप झालाय हो...

देशपांडे : नाही...अपराधाला क्षमा नाही! माझ्या बहिणीनं नंतर आत्म-हत्या केली. तिच्या आत्महत्येचं कारण तिनं मला सांगितलं होतं...फक्त मला...स्त्री–पुरुषसंबंधाविषयीच माझ्या मनात घृणा निर्माण झाली....मी अविवाहित राहिलो...फक्त एकच ध्येय डोळ्यांसमोर ठेवून की कधी ना कधी तुझी आणि माझी गाठ

होईल आणि मी तुझ्या पापाचं माप तुझ्या पदरात घालीन.

नखाते : पण... म्हणजे....

देशपांडे : आता मी तुला कुत्र्यासारखं गोळी घालून मारणार आहे... नखाते...(ब्रीफकेसमधून पिस्तूल काढतात)

नखाते : पण . पण हे तुम्ही ऑपरेशन टेबलावरही करू शकला असतात. नाहीतरी मी मरायलाच टेकलो होतो. त्याचवेळी तुम्ही मला मारलं असतं तर कुणाला संशयसुद्धा आला नसता ...(कसंनुसं हसत) याचा अर्थ मी मरावं अशी तुमची इच्छा नव्हती.... आत्ताही नाही...केवळ मला घाबरवण्यासाठी...

देशपांडे : शट् अप ! तू मरावास हीच माझी इच्छा आहे...अनेक वर्षांपासून...पण हॉस्पिटलमध्ये तू आलास तो माझा पेशंट म्हणून त्यावेळी तुला वाचवणं हे माझं कर्तव्य होतं.... जो व्यवसाय मी करतो त्या व्यवसायाचा तो धर्म होता आणि म्हणून त्यावेळी तो धर्म मी प्रामाणिकपणे पाळला... आता आपले संबंध डॉक्टर आणि पेशंट असे नाहीत. तेव्हा बलात्कारित बहिणीचा भाऊ म्हणून मी माझा वेगळा धर्म पाळणार आहे ...

नखाते : पण...डॉक्टर...प्लीज....

देशपांडे : तुझ्या कोणत्याही विनवण्यांचा माझ्यावर काहीही परिणाम होणार नाही नखाते... आणि माझ्यावरच्या संशयाची तू काळजीच करू नकोस... !

[ स्वतःचाच शर्ट टराटरा फाडतात .. एका खुर्चीला लाथ मारून ती उलटी पाडतात. ]

तुझी आणि माझी झटापट झाली आहे... तू तो चाकू घेऊन माझ्यावर हल्ला केला आहेस, त्या बॅगेतल्या पैशांसाठी. त्या चाकूवर फक्त तुझ्याच बोटांचे ठसे आहेत....आणि माझी समाजातली प्रतिमा काय आहे, ते तुला माहितीच आहे. शिवाय मघाशी गंगारामनं ती आणखी ठसवलीय... आणखी एक गोष्ट विसरू नकोस... आत्ता इन्स्पेक्टर माने त्यांच्या

कामासाठी इथे येणार आहेत. (ओरडून) नखाते...यू स्काउंडल !...यू पिग्!!...मर...मर....साल्या!

[ पिस्तूल रोखतात. पार्श्वसंगीत चालू होतं. रंगमंचावर अंधार होतो. पहिल्या प्रवेशाच्या सुरुवातीचं सगळं परत घडतं. म्हणजे अंधारातच पिस्तुलाचे दोन बार ऐकू येतात. पार्श्वसंगीताचा आवाज दूरवरून जवळ येतो. कर्कश होतो. पोलिसांच्या गाडीचा; सायरनचा आवाज येतो....सगळा गोंधळ वाढतो आणि मग सगळं शांत होतं...सगळं स्तब्ध असल्यासारखं...काळोख. ]

## ( प्रवेश तिसरा )

[ रंगमंच हलके हलके प्रकाशमान होतो. डॉक्टर एका खुर्चीत कोसळतात ... इन्स्पेक्टर माने अतिशय अस्वस्थपणे फेऱ्या मारतायत. ]

इन्स्पेक्टर : हं !...डॉक्टरसाहेब, हे सगळं तुम्ही मला उगीच सांगितलंत. तुम्ही नक्की या प्रकरणातून सुटला असतात!... आय ॲम सॉरी, पण मला आता अशी विनंती करू नका की हा सगळा इतिहास मी रेकॉर्डवर आणू नये...

देशपांडे : नाही...मी तशी विनंती अजिबात करणार नाही. उलट, तुम्ही तुमचं कर्तव्य चोख बजवावं अशीच विनंती मी तुम्हाला करीन.

इन्स्पेक्टर : थँक यू...थँक यू डॉक्टरसाहेब! आता मित्र म्हणून एक सांगा....सहज सुटण्यासारखी परिस्थिती असताना, तुम्ही आपण

होऊन ही सूडकथा का सांगितली ?

देशपांडे : मित्रा...एक डॉक्टर म्हणून पेशंटचा जीव न घेता तो वाचविण्याचा माझ्या व्यवसायाचा धर्म मी पाळला... बहिणीवरच्या अत्याचाराचा आणि तिच्या मृत्यूचा सूड घेऊन भावाचा धर्म मी पाळला...आता मी सुटू शकत असलो तरी सामाजिक कार्यकर्ता म्हणून काम करणाऱ्या माझ्यासारख्या जबाबदार नागरिकाचा हा धर्मच आहे की मी सगळं सत्य कथन करावं आणि केलेल्या अपराधाची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घ्यावी ... तो धर्मही मी पाळला...

[ याच क्षणी दृश्य गोठते. पडदा पडतो. ]

# २. आ ग शी

## ( प्रवेश पहिला )

[ तो आणि ती यांचं घर.
वेळ संध्याकाळची.
ती एका खुर्चीत निश्चल बसलेली... सगळं जगणं उसवल्यासारखी. विदीर्ण.
तो येतो. तिला पाहतो. सहानुभूतीनं नखशिखान्त निथळतो.... क्षणभरानं पुढे येतो. ]

तो : दिवा लावायचा नाहीस का... अंधारात बसलीस...
[ शब्द कानावर पडताच ती शहारते... मग लाकडासारखी कडक होते... पटकन उठते... दिवा लावते आणि परत खुर्चीकडे जाते...जणू या कामाची तिला किल्ली दिली होती. ]
अग...मी लावला असता की दिवा !

ती : आणि मी काय करू ?

तो : बैस की स्वस्थ.

ती : ( चिडल्यासारखी ) हे बघ, मी आजारी नाहीय, मला विश्रांतीची गरज नाही !

तो : नाही, पण तरीही

ती : तरीही काय ? बसून राहू ? की झोपून राहू ?

तो : चिडू नकोस ना ग !... आता जे घडलं, त्यात कोणाचा तरी काही दोष आहे का ?

ती : दोष कोणाचा !...कोणाचाही नाही...( एकदम फुटल्यासारखी ) पण मी बाई आहे ना रे ! कोणताही पुरुष मला एखादा फटका तोंडावर मारून आडवी करू शकतो, झोपवू शकतो

मला...

[ तो पटकन तिच्याजवळ जातो.... तिच्या खांद्यावर थोपटीत तिला शांत करण्याचा प्रयत्न करतो. ]

तो : प्लीज....प्लीज....अशी एक्साईट होऊ नकोस !

( ती त्याचे हात झटकते. गर्रकन वळते आणि कसल्याशा विचित्र रागानं त्याच्यावर ओरडते ).

ती : नाही ऽ नाही ऽ ! मला हात लावू नकोस. तू शुद्ध आहेस.... शुद्ध पुरुष...पूर्ण पुरुष ! तूही शुद्ध आणि ते दोघे...परवाचे... तेही शुद्ध...अखंड शुद्धतेचा यज्ञ चाललाय तुमच्या शरीरात... पण त्याची धग जाळतेय मला... अगदी नखशिखान्त जाळतेय !

( तरीही तो तिच्याजवळ येतो, प्रेमानं तिच्या मस्तकावर हात ठेवतो, प्रेमभरल्या स्वरात म्हणतो— ).

तो : राणी...असं काय करतेस...मी आहे ना...

( आता ती जागच्या जागी खचल्यासारखी खाली बसते... रडण्याचा एक तीव्र स्वर निघतो... )

ती : तू आहेस रे बाबा....तू आहेस !....अरे, तू परवाही होतासच ना ? मग नेमका त्या वेळी कुठे गेला होतास माझ्या राजा ऽऽ दोघे होते रे ते...मी फार असहाय्य होते...फार असहाय्य होते. जनावरासारखी वागवली रे त्यांनी मला...मारहाणही केली...एक...एक....एक खिळा ठोकला माझ्या नशिबात... कायमचा...मी काय करू ? मी काय करू ? आई ग ऽ ऽ मी आता करू तरी काय ऽ ऽ...

( त्यानंतर ती सगळं गमावल्याचं रडणं रडत राहते. तो तिला जवळ घेतो. थोपटतो. समजावतोही...पण समजूतदारपणे रडू देतो . तो भर ओसरू देतो )

तो : शांत हो बघू...असं वेड्यासारखं काय करायचं ते !....हे बघ, मी खंबीर आहे. जे घडलं ते तू विसरण्याचा प्रयत्न कर... करशील ना ?

ती : (थुंकल्यासारखी हसते...आणि मग) विसरते मी...लगेच विसरते... तू मरू देणार नाहीस...जगायचं म्हणजे मला विसरायलाच पाहिजे...

तो : दॅट्स् गुड !

ती : सोपं आहे का ते !! त्या गुंडांनी एकदाच अत्याचार केला, पण दोन दिवसांत माझी मीच स्वतःवर असंख्य वेळा बलात्कार केलेत...त्यांच्या धंदेवाईक गुंडगिरीला लाजवतील असे बलात्कार....मनाच्या चिंध्या चिंध्या करणारे...शरीराचा दाह करणारे....आता विसरतोस कसला बाबा, माझ्या मनाला त्याची सवय लागलीय... नाही, चटक लागलीय !

तो : हे बघ हे असं भयंकर बोलायलाच पाहिजे का ? आपल्याला सावरता कधीच येणार नाही का ?

ती : तू, आपल्याला "आपल्याला" म्हणालास...मलम लावल्या-सारखं वाटलं !...मला जवळ घेशील ? अगदी काहीही मनात न आणता ?... फक्त आज, आत्ता नाही खूप दिवस...या शरीरातलं सगळं पाणी डोळ्यांवाटे वाहून जाईपर्यंत !

तो : माझ्यावर विश्वास नाही का तुझा ? मलाही काही कमी धक्का नाही बसला !...पण मी ते विसरायचं ठरवलंय. लोकल्समधून, गर्दीच्या ठिकाणी इतक्या मुली हिंडतात ...त्यांना धक्के बसतात....नको त्या ठिकाणी सहेतुक हात लागतात... म्हणून काय सगळं पावित्र्य नष्ट झालंय असं आपण मानतो का ?...घरी आलं, आंघोळ केली की सगळे ओंगळवाणे स्पर्श, चाटणाऱ्या नजरा साफ धुऊन निघाल्या पाहिजेत म्हणजे मी तरी असं मानतो. घाव जबरदस्त आहे, कबूल, पण विसरायला पुढे आयुष्यही मोठं आहे...

ती : (खूप आशेनं विचारल्यासारखी) इतकं सोपं आहे का रे हे सगळं ? चार वाक्यं उच्चारली की मनातल्या सावल्या नाहीशा होतात ? दोन दिवस माझं भान हरपलंय ..दोन दिवस ..बरोब्बर सांगू ? एकूणपन्नास तास होतायत आत्ता !

तो : सोपं नाही गे त...मलाही जाणवतंय....पण एकदा विसरायचं म्हटल्यावर आत्ताच्या; याच क्षणापासून प्रयत्न करायला काय हरकत आहे... ?

ती : ( तळमळत ) कसा प्रयत्न करू रे देवा, कसा प्रयत्न करू !

तो : ( तिचा हात हातात घेत ) मी तुझ्याबरोबर आहे... आज तुझी आई येतीय... बाबा येतायत....

ती : ( शहारून ) आई...बाबा !... म्हणजे त्यांना... ?

तो : वाघांनी फोन केला...मलाही माहिती नव्हतं....नंतर सांगितलं !

ती : मला एक बाबा आहेत...एक आई आहे....हे सगळे सगळे संदर्भ आत्ता लक्षात येतायत ! मला वाटलं....मी एकटीच आहे...मी एकटी आणि ते दोन... एक तो काळा, देखणा... पिंगट डोळ्यांचा...त्याचा चेहरा माझ्या नजरेत उतरून थिजलाय... कायम झालाय....त्याच्या तोंडच्या दारूच्या का कसल्या त्या वासानं वांती झाली...तरीही त्याचं...

तो : ( अचानकपणे ओरडून ) शटाप् !...शटाप् ! !...
( ती डोळे विस्फारून गप्प उभी...काहीही न समजल्यासारखी. तो तिच्याकडे पाहतो. मग स्वतःला सावरतो... ) आय ॲम् सॉरी ! रियली...

ती : पण...पण काय झालं ?

तो : कुठाय काय...मी सांगत होतो की आईबाबा येतील इतक्यात— मग तुला जरा मोकळं वाटेल...आपण दोघंच्या दोघंच आहोत ना ! जरा माणसं आली की ओसरेल बघ...

ती : नको रे माणसं !

तो : असं काय करतेस !....तुझे आई–वडील आहेत ते...

ती : आई–वडील असले तरी ते सहानुभूती दाखवतील ! इतक्या प्रेमळपणे पाहतील माझ्याकडे की मला ओरडावंसं वाटेल की... ' हो ! माझ्यावर बलात्कार झालाय ! '

तो : नो !...आता तसलं अवाक्षरही काढायचं नाही तोंडातून....ते सगळं खोल, आत गाडून टाकायचं...तू जरा विश्रांती घेतेस

का ? पडून राहा थोडा वेळ....

ती : आडवी पडले की मला भास होतात वेगवेगळे....

तो : मग बाहेर येतेस का ? मोकळ्या हवेत जाऊन येऊ– तुला बरं वाटेल...

(ती एकदम रडायला लागते...रडत रडत खरोखरीच त्याच्या पाया पडत म्हणते...)

ती : नको रे नको....मला बाहेर नेऊ नको....मला नाही आता सहन होणार...सगळ्यांनाच समजलंय ! मी विचार केलाय...मला माहितीय की मला पाहिल्याबरोबर लोक मनातल्या मनात त्या प्रसंगाची कल्पना करणार...आणि त्यांच्या मनात येईल त्या अवस्थेत मला पाहणार !...मी पाया पडते रे...मला बाहेर नेऊ नकोस !

(तोही जरा हलतो...किंचितसा हतबलही होतो...मग परत एकदा कुठूनसं बळ आणल्यासारखा बोलत तिला उठवतो)

तो : अगं...नको तर नाही जाऊ बाहेर ! त्यात एवढं हवालदिल कशाला व्हायचं ! घरातच बसू...कोणत्या ना कोणत्या उपायानं तुझं मन रमलं म्हणजे झालं ! माझीही इच्छा नाही बाहेर जाण्याची...साल्या, आसपासच्या लोकांच्या नजरा अशा काही पाठलाग करतात की वाटतं भोकं पडतील अंगाला...परवापासून दोनतीन वेळाच बाहेर गेलो...केवळ जायंच लागलं म्हणून... पण दाराआडून, खिडक्याआडून नजरांचे टेंभे पेटले होते नुसते !...समोरून येणारे तर असे पहात होते की जणू माझ्यातून आरपार पाहतायत ! समोरच्या चाळीतील ती म्हातारी... तिनं तर मला थांबवून विचारलं, 'तू अमुक अमुक ना रे, बाबा ?' आणि एवढंच बोलून...काचेच्या गोट्यांसारख्या मेलेल्या नजरेनं स्वतःचं समाधान होईपर्यन्त मला न्याहाळीत राहिली !

ती : असाच त्रास होणार तुला...असाच त्रास सहन करावा लागणार जन्मभर ! तो प्रसंग आपली पाठ कधी सोडणार नाही .... का भोगायचं ठरवलंस तू हे ? का अडवलंस मला ?...मी मेले असते

तर मीही सुटले असते आणि तूही सुटला असतास ...अजूनही मला अडवू नकोस; शपथा घालू नकोस...मला काय सहन करावं लागतंय याची तुला कल्पनाही करता येणार नाही ... बाळंतपणाच्या वेदनांसारखं ते फक्त बाईलाच समजणार ... हे सगळं सहन करण्यापेक्षा धडधडा पेटून जळताना मला शांत शांत वाटेल!

तो : चूप! असं बोलायचं नाही. जीवबीव देण्याच्या गोष्टी बोलायच्या सुद्धा नाहीत...सगळ्या गोष्टींपेक्षा तुझं असणं माझ्या दृष्टीनं फार महत्त्वाचं आहे.

ती : (विषण्ण हसते) नाही नाही...नाहीच समजू शकत तुला... नाहीतर तू मला सोडवलं असतंस ... असं प्रत्येक क्षणाला नवं मरण भोगण्यापेक्षा, एकदाच संपवू दिलं असतंस मला सगळं!

तो : (खचल्यासारखा) प्लीज प्लीऽऽज!

ती : तुला फसवून मी मरणार नाही!... पण मला काहीतरी केलं पाहिजे...जगायचं तर काहीतरी केलं पाहिजे.

तो : मी एक विचार केलाय.

ती : हं?

तो : आपण हे गाव सोडू. मी आजच तसा बदलीचा प्रयत्न केला आहे. वातावरण बदलेल, आजूबाजूची माणसं बदलतील.... प्रसंगाची आठवण द्यायला काहीही असणार नाही.

ती : पण अंगात हे विष भिनलंय त्याचं काय करू मी? कुठंही सुखानं जगू देणार नाही ते मला!

तो : (जरा चिडल्यासारखा) असं काय करतेस? आपल्या हातात आहे तेवढं तरी करून बघायला नको का?

ती : कर बाबा ... तेवढंच आपल्याला करता येईल ... माझा नकार नाहीय...कशालाच नाही!

तो : हे बघ; स्वतः सावर... मलाही समजावून घेण्याचा प्रयत्न कर! मला तरी कसला आधार आहे? तुझे आई-बाबा आले की त्यांचा विचार घेऊ.

ती : मी माहेरच्या गावी जाणार नाही... ओळखीचं एकही माणूस असणार नाही, अशा गावी मला घेऊन चल....प्लीज.

तो : ठीक आहे. आपण दुसऱ्या प्रांतातल्या कुठल्यातरी दूरवरच्या खेड्यात जाऊ. आपल्या ओळखीची माणसंच काय, पण ओळखीच्या भाषेचाही शब्द कानावर पडणार नाही!

ती : तरीही तुझ्या नजरेची भाषा तीच असेल!

[ आता तो संपूर्ण गप्प झालाय...विलक्षण चक्रव्यूहात सापडल्यासारखा बावरून गप्प झालाय. क्षणभर अतिशय बोचरी शांतता. ती वाट पहाते त्याच्या बोलण्याची ... आणि मग न राहवून ]

बोल रे...काहीतरी बोल ना! गप्प राहू नकोस...

तो : (निराशेनं) काय बोलू? माझे प्रयत्न तुला समजतच नाहीत!

ती : आत्ता तू मला समजून घे .. मी प्रयत्न करतेय...अरे, राखेतून उठून उभं राहण्याचा प्रयत्न आहे हा! मी पांगळी झालेय... मला उभं तर राहू दे ..

तो : ओ के ओ के! तू शांत हो (क्षणभरानं) अजून गाडी आली नाही की काय म्हणावं! मी स्टँडवर जाऊन पाहून येऊ का?

ती : (ओरडल्यासारखी) नाहीऽ! तू जाऊ नकोस ..परत अजिबात जायचं नाहीस!

तो : अग, आपल्या मोलकरणीला सांगतो ना तुला सोबत करायला... ती इथं आल्यावर मग मी जाईन.

ती : नको म्हटलं ना!

तो : खाली तर राहते. दोन मिनिटांत सांगतो तिला!

ती : नकोय ती! (शहारल्यासारखी) सकाळी आली होती. झू मधलं जनावर न्याहाळावं तसं न्याहाळीत होती मला. चहा करून दिला आणि कपबशी विसळायला गेले तर मला म्हणाली, 'मी विसळते...तुम्ही पडा जरा!' जणू मी प्रचंड आजारी आहे... महारोगानं माझे हातपाय झडलेत, मी म्हणजे एक लूत भरलेली सडकी कुत्री आहे!

[ प्रचंड चिडल्यासारखी, डोळे विस्फारून उसासत राहते....

[illegible] ...गशी
[illegible] 23008 दि. 26.5.80
[illegible]

अगदी दोनतीन क्षणच ]

मला चीड येते या सहानुभूतीची ! मला माहितीय, त्यांना विचारायचं असतं... कसा झाला हा प्रकार... कोण आधी... नेमकं काय वाटतं बलात्कार होताना ? न बोलता सगळं सगळं विचारीत असतात...मी विस्कटून जाते.. त्यापेक्षा... त्यापेक्षा तू असं कर...माझे सगळे कपडे फाडून टाक. आणि एक सुरी घेऊन ठिकठिकाणी मला भोसक ... जीव जाईपर्यंत नाही, पण अंगातलं सगळं रक्त वाहून जाईपर्यंत...खूप ठिकाणी भोसक... प्लीज...मला मारा रे कुणी तरी...फटके मारा.. माझे हाल हाल करा....हाल हाल करा माझे !

[ असह्य होऊन रडत राहते. तो तिला मिठीत घेतो. थोपटीत राहतो, तिचं मस्तक...निःशब्दपणे ... पण आता मात्र त्याच्या डोळ्यांत पाणी आहे. काही वेळानं तीच थोडी सावरते. त्याच्यापासून दूर होते... डोळे पुशीत म्हणते.. ]

तुझं बरोबर आहे आपण हे गाव सोडून देऊ. तावडतोब... म्हणजे शक्य तितक्या लवकर !

तो : थँक यू थँक यू डियर !...माझी अवस्था त्रिशंकूसारखी झाली होती... आता जरा आधार वाटला ! माझ्यावर विश्वास ठेव. या सगळ्यातून मी तुला बाहेर काढीन .. म्हणजे आपण बाहेर पडू

( याचवेळी तिचे आई–वडील येतात....त्यांच्या वागण्या–चालण्यात विचित्र तणाव आहे. दोघांचंही लक्ष त्यांच्याकडे जातं. कुणीच काही बोलत नाही आई तिच्या समोर जाऊन उभी राहते... ती मात्र आईकडे पहात निःशब्द उभी आई अंतर्बाह्य हालते...तिच्या डोक्यावरून हात फिरवीत म्हणते— )

आई : काय ग पोरी हे नशीब तुझं !

[ आईचे शब्द ऐकताच ती फुटते. किंकाळी फोडल्यासारखी रडत आईऽ आईऽ म्हणत आईच्या कुशीत शिरते. मुक्तपणे रडते. आई, ‘ उगी उगी–माझी बाळ ती ’ वगैरे म्हणत तिला

समजावण्याच्या प्रयत्नात स्वतः रडत राहते... हे दोघे पुतळ्या-सारखे उभे....]

ती : आऽई ! आईऽ मला कुशीत घे ग.... मला जवळ घे. माझ्या अंगावर हात टाकून माझ्याजवळ झोप... मला रडू दे.... माझी समजूत घाल...आई, आई काहीतरी कर ग !

आई : (स्वतःचे डोळे पुशीत) चल, आत चल ..

[एकमेकींच्या आधारानं दोघी आत जातात. त्या आत जाई-पर्यंत त्यांच्याकडे ताठरल्या नजरेनं पाहात राहिलेले बाबा, त्या आत जाताच कपाळ गच्च दाबून धरतात आणि खचल्यासारखे खाली बसतात.

तो त्यांच्या जवळ जातो. त्यांच्या खांद्यावर हात ठेवतो....ते वर बघतात आणि ढासळल्यासारखे म्हणतात.]

बाबा : हे पाहायचं बाकी राहिलं होतं ... तेही दाखवलं म्हातारपणात नशिबानं ! (पटकन त्याचा हात दोन्ही हातात घेतात आणि अगतिकपणे त्याला विचारतात) का घडलं हे ? कसं घडलं ? (त्यांच्या हातातून हात सोडवून घेत तो बाजूला जातो.)

तो : आता त्या गोष्टीविषयी चर्चा करण्यात काही अर्थ नाही.

बाबा : (सुस्कारून) हं ऽऽ (क्षणभरानं) तेही बरोबर आहे...असो. ईश्वरेच्छा बलियसी !

[क्षणभर बोचरी शांतता ...तो दातांनी नख कुरतडत विचार-मग्न. बाबा अस्वस्थ.]

तुम्ही काय ठरवलंत ?

तो : अं ?

बाबा : नाही, मी म्हटलं, तुम्ही काय ठरवलंत ?

तो : कशाबद्दल ?

बाबा : (शब्दांवर अडखळत बोलतात).... म्हणजे... एकंदर !... म्हणजे असं पाहा, माझी पोर भावडी आहे...निरागस आहे... मला असं म्हणायचंय, की जे काय झालं, त्यात तिचा काय दोष ? म्हणजे लक्षात घ्या...मला कोणतीही बळजबरी तुमच्या-

नर करायची नाहीय! हा शेवटी सगळ्या आयुष्याचा प्रश्न आहे... थोडक्यात काय, की माझी मुलगी मला जड नाही.... तिला सांभाळायची वेळ आली तर मी समर्थ आहे.... तिचं नशीव फुटकं....तुमचं आयुष्य तरी कशाला डागाळायचं?

(त्यांच्या एकेका सूचक वाक्याबरोबर तो ताठरत जातो...मग रोखून पहात, ओरडल्यासारखा म्हणतो)

तो : आर यू गोइंग मॅड!...काय वाटेल ते काय बोलताय!

बाबा : म्हणजे?

तो : आल्या प्रसंगातून बाहेर पडण्याची आमची धडपड चाललीय. हे गाव सोडण्याचा आमचा विचार पक्का झालाय. तिच्या मनाची अवस्था किती नाजूक झालीय... आणि तिला त्यातून सहीसलामत बाहेर काढण्यासाठी माझ्या जिवाचा आकांत चाललाय.... आणि नेमक्या याच वेळी तुम्ही नको ते सजेस्ट करता आहात!

(बाबांचे डोळे डबडबतात... घाईघाईनं उठून ते त्याचे हात हातात घेतात.)

बाबा : थँक यू...थँक यू!...माझ्या मनाची परिस्थिती विचित्र झाली होती ..काहीतरी बडबडलो असेन...माफ करा....तुम्ही...तुम्ही म्हणजे ..जाऊ द्या, जे मनात वाटलं ते शब्दानं बोलून दाखवीत नाही मी... जन्मभर ऋणी राहीन.

तो : या काळात असले मागासलेले विचार करण्याची गरजच नाही, बाबा! आणि जरी जुनाट विचार करायची सवय झालेली असली तरी त्यालाही एक उत्तर आहे माझ्याजवळ आपल्या पूर्वजांनीच, मला वाटतं मनूनं, सांगून ठेवलंय, प्रत्येक मासिक-धर्मानंतर स्त्री ही कुमारिकाच असते... पावित्र्याच्या भलत्या कल्पना नाहीत माझ्या डोक्यात!

बाबा : तिचं पूर्वजन्मीचं पुण्य थोर म्हणायचं इतकंच! नाहीतर तुमच्यासारख्या माणसाची गाठ कशाला होते!

(डोळे पुसत बाबा आतल्या घराकडे निघतात...तो खुर्चीकडे निघतो. रंगमंचावर अंधार होतो.)

## ( प्रवेश दुसरा )

[ दुसऱ्या दिवसाची रात्र.
आई खाली बसलेली...आईच्या मांडीवर डोकं ठेवून ती पडलीय. नखानं जमिनीवर रेघा मारतेय...पण बरीचशी सावरल्यासारखी वाटते आई तिच्या केसांतून हात फिरवतेय. ]

आई : इतका वेळ का बरं लागला या दोघांना ?

ती : पोलिसांचं प्रकरण काय इतक्या लवकर आटोपणार आहे ?

आई : अग पण मिटवायला गेलेत ना हे ? ... मिटवून यायचं लगेच !

ती : ( क्षीण हसून ) इतकं सोपं नसतं ते आई—

आई : तुम्ही तक्रार केली होती का पोलिसात ?

ती : कुणीतरी शेजाऱ्यानं रिपोर्ट केला. आपण कशाला तक्रार करायची ! तक्रार करून गुंडांना कदाचित शिक्षा होईलही....पण आपल्या मनाची शांती परत मिळणार आहे का ? अब्रूचे धिंडवडे निघाले. त्याची लक्तरं आणखी वेशीवर वाळत घालून काय मिळणार आहे ?

आई : ( सुस्कारून ) खरंच बाई ! या शेजाऱ्या–पाजाऱ्यांना, मेल्यांना हा नसता उद्योग कुणी सांगितला होता ?

ती : अशा वेळी कुणीही, कुणाला काहीही सांगावं लागत नाही... सगळे अगदी मनापासून, उत्साहानं सगळं करतात ! आई, त्या दोन गुंडांनी माझ्यावर केले नसतील इतके अत्याचार आजूबाजूच्या सभ्यमाणसांनी आणि पोलिसांनी केले...एक थ्रिल निर्माण झालं होतं सगळ्यांच्या आयुष्यात ! दोन दिवस कसे चवदार गेले !

आई : गप्प ग बाई ! काहीतरी वेडंवाकडं बोलत बसतेस आणि मग स्वतःलाच त्रास होतो !

ती : बोलू देत जा ग मला ... मोकळं वाटतं...

आई : पण कशाला तेच तेच उगाळायचं !...आपलं नशीब म्हणून

आपल्याला इनकं चांगलं माणूस मिळालं साथीला... हे भाग्य नाही का ?

ती : खरंय, आई !

आई : सबंध प्रवासभर काय काय विचार करीत आलो आम्ही काल... पण तुझा नवरा...साक्षात देवमाणूस ग बाई ! आपली पुण्याई रिती झाली नाही म्हणूनच ते भेटले.... ह्यांनी आडून आडून विचारलं ग त्यांना... तर चिडले म्हणे... अंगावर ओरडले ह्यांच्या देखील ! म्हणाले, आपल्या पूर्वजांनीच सांगून ठेवलंय की प्रत्येक मासिक धर्मानंतर स्त्री ही कुमारिकाच असते ! केवढं मोठं मन ! !

ती : या धर्मा-अधर्माचं मला काही कळत नाही, आई...पण त्याच्या मनात काहीही किल्मिष नसताना, त्याच्याजवळ जावं... या-शिवाय आणखी वेगळं असं सुख काय असणार आहे ! ... निदान माझ्या आयुष्यात तरी तेवढं एकच उरलंय ! त्यासाठीच हे जगणं...

आई : खरंय ग, बाई...

( याच वेळी रंगमंचावर अंधार होतो )

## ( प्रवेश तिसरा )

[ पंधरा-वीस दिवस उलटून गेलेत.
वेळ रात्रीची.
तो खुर्चीत वाचीत बसलाय. मधूनच अस्वस्थ झाल्यासारखा इकडे तिकडे बघतो आणि मग परत अधाशासारखा वाचायला लागतो.
ती आतल्या खोलीत येते....ती सावरलीय—तरी चेहरा अजून ओढलेलाच ]

ती : तू अजून वाचीत बसलायस ?

तो : ( दचकल्यासारखा ) अं ?... हो ! बसलो झालं....पण तू अजून जागीच ?

ती : दुपारी आई गावाला गेली...आणि मला अगदी एकटं एकटं वाटायला लागलं.

तो : त्यात एकटं काय वाटायचंय ! प्रयत्न कर— आत्ता झोप येईल.

ती : पण तू काय वाचतोयस एवढं ?

तो : काहीतरी वाचायचं झालं !

ती : पण काय आहे ते सांग ना...

तो : हे...लेडी चॅटर्लीज लव्हर !

ती : शीः कसली अश्लील पुस्तकं वाचतोस !

तो : करमणूक म्हणून वाचायचं !

ती : झोप नाही आली ?

तो : अं...नाही...तू झोप जा. मी थोडा वेळ वाचतो. मग झोपेन.. पांघरूण तेवढं दे इथे...

ती : इथं झोपणार ?

तो : किती तरी दिवस झाले...इथंच आहे मी.

ती : तेव्हा आई–बाबा होते...आज आत ये ना....मला एकटीला भीती वाटते बेडरूममध्ये...मी इथं येऊ का ?

तो : नको...

ती : का ?

तो : सहजच ग ! अच्छा, गुड नाईट !

ती : नाही ! ( तीव्रतेनं ) मला सांग, का ते ?

तो : मी वाचतोय !

ती : नाही ! ( आणखी तीव्रतेनं ) कां ?...कां ?

तो : म्हणजे....ते हे...( अडखळतो ... कसं सांगावं ते त्याला समजत नाही. )

ती : बोल ना....बोल ना...प्लीज...

तो : जाऊ दे ना !

ती : ( आवाज चिरकत जातो ) मला हवंय ते कारण ... मला माहिती व्हायला हवंय !

तो अग ... अजून तुझी एम सी ...

ती : ( संपूर्णपणे ढासळतच.... विचित्र आवाजात ) काय म्हणालास ?

तो : पाळी आली नाही ना !

[ तिचा सबंध चेहरा व्याकुळतेनं झाकोळून येतो ... क्षणभर काहीही न बोलता ती त्याच्याकडे पाहत राहते ... खालचा ओठ फुटेपर्यंत दातांनी दाबीत राहते ... आणि मग कसंबसं म्हणते– ]

ती : अस्सं !

तो : काहीतरी विचार करीत बसू नकोस.... गुड नाईट !

[ ती गर्रकन वळून आत निघून जाते. तिच्या या विचित्रपणे जाण्याकडे तो क्षणभर बघत राहतो आणि मग खांदे उडवतो. परत वाचनात लक्ष घालतो ..

पार्श्वसंगीताचा ताण वाढतो.

काही क्षण जातात.

आणि अचानक प्रकाशाचा भला मोठा लोळ आतल्या खोलीत दिसतो ... त्याबरोबर धपकन् काहीतरी पडल्याचा आवाज येतो आणि त्या पाठोपाठ ' आई ....आई ग ऽऽ ' असा तिच्या कण्हण्याचा आवाज येत राहतो.

प्रथम काय घडतंय हे त्याला कळत नाही ... तो दचकतो. पटकन उठतो ... ' काय झालं ग ? ' असं म्हणत आतल्या दरवाज्याशी जातो. डोकावतो. आतला प्रकार पाहताच हादरतो. ' ओह नो ऽऽ ! ' असं ओरडतो ... आणि मग ' हेल्प हेल्प ' असं ओरडत आत घुसतो.

रंगमंचावर अगदी न कळत अंधार होतो. फक्त आतल्या खोलीतून धडाधडा पेटलेल्या ज्वाळांचा लालसर प्रकाश सबंध रंगमंचभर नाचत राहतो.

याच पार्श्वभूमीवर संगीताबरोबरच सायरनचा आवाजही येऊ लागतो.... पार्श्वसंगीताचा गोंगाट एका उत्कर्षबिंदूपर्यंत पोहोचतो. आणि पडदा शांतपणे खाली येत असतो. ]

# ३. अंकुर

## प्रवेश १ ला

[ वेळ : संध्याकाळची.
काळ : कोणताही.
वस्तीपासून दूरवरच्या एका जुनाट किल्ल्यातली ही तळघरासारखी जागा आहे. मातीचे ढिगारे, मोठे मोठे दगड, अर्धवट पडलेल्या भिंती आणि कोळिष्टकं माजलेली–एकंदर गूढ वाटावी अशी ही जागा आहे. भिंतीत टेंभे रोवून ठेवलेले आहेत. त्यांचा मंद पिवळसर प्रकाश पसरला आहे.
' नवक्रांती ' या क्रांतिकारी संघटनेची ही गुप्त आणि मुख्य जागा आहे. एका भिंतीजवळच्या दगडी आसनावर ' मगज ' नावाचा एक सत्तरीच्या पुढचा वृद्ध, एक मोठा ग्रंथ वाचीत बसला आहे. थोड्याच वेळात डाव्या बाजूने ' नादज ' हा विशीतला युवक प्रवेश करतो. त्याच्या हातात जुन्या पद्धतीचं पिस्तूल आहे. ]

नादज : मगज आजोबा, आज सहापैकी पाच गोळ्या बरोब्बर निशाणावर बसल्या–प्रगती आहे की नाही ?

मगज : आहे तर !...निशाणावर अचूक गोळीबार करणे...हं, नादज, अरे, क्रांतीच्या पिल्लांना सर्वांत प्रथम सफाई येते ती याच कामात !

नादज : यायलाच हवी. पिस्तूल चालवता नाही आलं, तर क्रांती कशी करणार ?

मगज : शस्त्र चालवणारे हात क्रांती करतात आणि युद्ध जिंकतात ही वेडगळ कल्पना आधी डोक्यातून काढून टाक नादज ! बेटा,

त्या हातांना शस्त्र पुरवणारा जो मेंदू असतो ना, तो या लढाया जिंकत असतो.

नादज : ( किंचितसा नाराज ) मला वाटलं, तुम्ही कौतुक कराल!

मगज : कौतुक तर आहेच– नेमबाजी हे एक कौशल्य आहे–कौशल्याचं कौतुक व्हायलाच हवं...आणि तुझ्या या वयात तू जी प्रगती केलीयस ती खरोखरीच कौतुकास्पद आहे.

नादज : पण आत्ता तर तुम्ही म्हणालात...

मगज : फक्त तेवढंच महत्त्वाचं नाही; असं म्हणायचं होतं मला. शस्त्र तर एक निर्जीव वस्तू आहे. प्रस्थापित शासनाविषयीची चीड, अन्यायाविरुद्ध संताप आणि सामान्यांचं शासन आणण्याची तळमळ....या सगळ्या भावना त्या शस्त्राच्या ठायी कधी उत्पन्न होत नसतात नादज!...त्या आपल्या मनात उपजाव्या लागतात, खदखदाव्या लागतात–म्हणजे मग क्रांती होते आणि कधी कधी तर ती रक्तविहीनसुद्धा असते!

नादज : ( हसतो ) रक्तविहीन...आणि क्रांती! तुम्ही पाहिलीय?

मगज : खरं सांगू तुला? इतकं पाहिलं, इतकं वाचलं आणि खूप काम केलं....पण रक्तविहीनच काय, पण कुठल्याच प्रकारची क्रांती, कोणत्याच क्रांतिकारकांनी कधीच पाहिलेली नसते, असं माझं ठाम मत व्हायला लागलंय.

नादज : तुम्ही काहीतरी गूढ बोलताय–मला समजलं नाही!

मगज : क्रांतिवीरांच्या स्वप्नात क्रांती राहते...ती प्रत्यक्षात कधी येत नाही.

नादज : जगातल्या क्रांतिकारकांच्या कथा काय असं सांगतात?

मगज : क्रांतिकारकांच्या आणि क्रांतीच्या ‘ कथा ’ नसतात बेटा, इतिहास असतो! त्याचा अवमान मला करायचा नाही. पण मी बोलतोय ते राज्यक्रांतीच्या, उलथापालथ घडविणाऱ्या, तेवढ्या क्षणापुरतं नाही. ही उलथापालथ घडून गेल्यानंतर एक नवं शासन यावं लागतं. त्या शासनाची उभारणी क्रांतीतत्त्वाच्या पायावर व्हावी लागते आणि वर्षानुवर्षं त्याचा कारभार तशाच पद्धतीनं

चालावा लागतो. क्रांतिकारकाचं स्वप्न थेट इथपर्यंत पोहोचलेलं असतं ! पण तसं कधी घडल्याचं इतिहास सांगत नाही. शासन उखडलं जातं, बदल होतात. पण खुर्चीवरची माणसं फक्त बदलतात. शासनकर्ते बदलतात. शासनपद्धती आमूलाग्र अशी कधीच बदलत नाही....आणि म्हणूनच क्रांतिकारक अस्वस्थच राहतो. काही काळातच नवी शासनव्यवस्थाही मुर्दाड बनते. आणि क्रांतिकारक पुन्हा नव्या क्रांतीची स्वप्नं पाहायला लागतो. कारण त्याचं स्वप्न प्रत्यक्षात कधी आलेलंच नसतं !

नादज : मग मी नेमकं काय करायला हवं ?

मगज : ( हसतो ) प्रामाणिक आहेस ! आपला लढा कोणाविरुद्ध आहे, हे तर तुला समजेलच... पण तो नेमका कशाविरुद्ध आहे, हे समजावून घेण्याचा प्रयत्न कर... तुझा बाप, माझा पुतण्या-यशकेतू या कार्यात कामी आला. 'क्रांतिसूर्य' संघटनेच्या कामासाठी त्यानं आपले प्राण वेचले. त्याचा मला अभिमान वाटायचा. स्वतःचे प्राण अर्पण करण्याची संधी नियतीनं त्याच्या पदरी घालावी, याची असूयाही वाटायची मला !... त्याच्या पश्चात तुझा सांभाळ करण्याची जबाबदारी घेऊन त्याच्या कार्यातून थोडं तरी ऋणमुक्त होता येईल, अशी कल्पना मी केली होती....पण नंतर वाटायला लागलं की त्याचं हे बलिदान व्यर्थ झालं की काय !

नादज : असं म्हणू नका आजोबा, मी हुतात्म्याचा मुलगा आहे, याचा मला अभिमान आहे ! मला हे कळत नाही की 'क्रांतिसूर्य' सारखी बलवान संघटना तुम्ही बाबांच्या मृत्यूनंतर का सोडलीत ?

मगज : तसा तो फार मोठा इतिहास आहे... खरं तर अगदी तरुणपणी व्याघ्रसेन राजाचे आम्ही दोन निष्ठावान सेवक होतो- एक मी आणि दुसरा कर्मक.

नादज : कर्मक ? म्हणजे आत्ता जे...

मगज : होय. आत्ताच्या 'क्रांतिसूर्य' संघटनेचा सर्वोच्च नेता ! राजाच्या

पदरी असतानाच आमची मैत्री झाली. राजाच्या वैयक्तिक संरक्षक दलात आम्ही होतो. त्यामुळे राज्यकारभाराची आम्हाला अगदी जवळून माहिती झाली. सतत व्याघ्रसेन महाराजांच्या-बरोबर राहिल्यानं ते जिथे जातील तिथे जाण्याची संधी मिळाली. संपूर्ण देश पाहायला मिळाला. कर्मक हा जात्याच बुद्धिमान होता !

नादज : ज्या संघटनेचं आणि आपलं हाडवैर आहे त्या संघटनेच्या नेत्याला तुम्ही बुद्धिमान म्हणता, आजोबा ?

मगज : मी कुणी साधू नाही पोरा. लढवय्या आहे ! आपल्या शत्रूचा एखादा दोष माहिती नसला तरी चालेल, पण त्याच्या गुणांची मात्र आपल्याला पक्की माहिती पाहिजे. कारण त्याचा असा एखादा गुणच आपल्याला आडवा येणार असतो ! राहील हे लक्षात ?

नादज : नक्की राहील !...मग तुमच्या त्या बुद्धिमान कर्मकानं असं केलं तरी काय ?

मगज : तसं सुरवातीला त्यानं काहीच केलं नाही. आपल्या बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर त्यानं परिस्थितीचा अभ्यास केला. काही प्रमेयं मांडली. आणि तो गप्प बसला... जातिवंत बुद्धिजीवी, अन्यायी शासनकर्त्याच्या राज्यात वागेल, तसाच तो वागला ! मला तर वाटतं, त्या सुरक्षित जगण्याची, ऐषारामाची त्याला चटकही लागली होती !

नादज : आणि मग एकदम संघटना बांधण्यापर्यंत प्रगती झाली ?

मगज : व्याघ्रसेनाच्या अन्यायी, बेजबाबदार शासनाविषयीचा संताप प्रथम माझ्या मनात जागा झाला ठायी ठायी पाहिलेला अन्याय, भोगलेलं आणि पाहिलेलं दारिद्र्य यांचा आणि शासनाचा मन मानेल तसा कारभार, यांचा कुठे मेळ बसेना....राज्यकर्त्यांच्या शब्दांतली गरिबीविषयीची कणव आणि वागणुकीत असलेली घृणा, यांच्यातली तफावत सहन होईना....आपल्या देशातून दारिद्र्य, रोगराई, भ्रष्टाचार, अन्याय, असमानता या सगळ्या

गोष्टी उच्चाटण्याची भाषा तोंडाने करीत, शासन याच गोष्टींचे मळे देशात फुलवीत होतं. स्वतःच्या स्वार्थासाठी हेच पीक काढण्यात गढलं होतं! नागरिक अडाणीच हवा होता. गरिबीच्या वणव्यात होरपळताना त्याला रोजच्या भाकरीशिवाय इतर काही सुचणं शक्यच नव्हतं आणि तेच शासनाला हवं होतं. असा एखादा देखील विचार वर्षानुवर्षे, पिढ्यान्‌पिढ्या कोणतेही कष्ट न घेता सुखोपभोग घेण्याच्या त्यांच्या कार्यक्रमात अडथळा आणणारा ठरला असता! हे तण त्यांनीच माजवलं होतं...आणि ही शासनव्यवस्था उलथून पाडण्याशिवाय दुसरा काही पर्याय नव्हता. कोणतीही किंमत देऊन क्रांती घडायला हवी होती. त्याशिवाय सर्वसामान्यांचं राज्य प्रस्थापित झालं नसतं...त्यांचे भोग संपले नसते!

नादज : हीच! हीच तळमळ आमच्याही मनात असते आजोबा. पण ती बोलता येत नाही. चार माणसं जमली तर त्यांच्या समोर मांडता येत नाही! तुमच्या या विचारांनी त्या वेळी सगळे तरुण तुमच्या भोवताली जमा झाले असतील—

मगज : सगळे नाही, पण बहुसंख्य! काही तरुणांची जिंदगी सुखासीन नव्हती, पण कष्टांचीही नव्हती. अशा मध्यमवर्गीय तरुणांना या विचारांचा अर्थच समजू शकला नाही! थोडे हातपाय हलवले तर दोन वेळा पोटापुरतं मिळतं, थोडे पैसे चारले तर आणखीही काही सुखसोयी मिळतात— मग वरच्या खुर्चीत कोण बसलाय•याची उठाठेव करायची कशाला, असा सरळ विचार करणारी ही मंडळी होती. अशा लोकांपासून सावध रहावं लागतं नादज. नीट लक्षात ठेव— राजाच्या वाढदिवसाच्या रोषणाईचा लखलखाट पहायची संधी मिळणं, यात त्यांना आयुष्याची इतिकर्तव्यता वाटते! अतिशय दगाबाज जात.

नादज : पण आजोबा, यात कमेकाचा संबंध कसा काय आला?

मगज : कर्मकाला जागं करावं लागलं. क्रांतीची संघटना बांधण्यासाठी त्याची बुद्धी फार मोलाची ठरणार होती...फक्त, प्रत्यक्ष कार्य

करण्यासाठी त्याच्या सतत पाठीमागे लागावं लागणार होतं. आम्ही दोघांनी मिळून 'क्रांतिसूर्य' या संघटनेची स्थापना केली. आमचे विचार लक्षात येताच आम्हाला शासनानं सेवेतून मुक्त केलं आणि तुरुंगात डांबलं! पण भ्रष्ट शासनव्यवस्थेचेच तुरुंग असल्यानं आम्हाला त्याची चिंता नव्हती....आमची कधी सुटका झाली ते आम्हालाही कळलं नाही! मग आम्ही भूमिगत राहून कामाला सुरुवात केली. सारख्या विचारांचे हजारो तरुण आम्हाला सामील झाले. संघटना मोठी झाली. फोफावली....आणि व्याघ्रसेनाच्या शासनाला हादरे बसायला लागले. कर्मकाचं बुद्धिकौशल्य आणि माझं संघटनचातुर्य यांच्या जोरावर काही वर्षांत आम्ही बरीच मजल मारली....मोठमोठे लढे आमची संघटना लढली...

नादज : आणि अशा लढ्यांतून अनेक तरुण मारले गेले. ज्यात माझे बाबाही होते!

मगज : हो! त्या हुतात्म्यांच्या रक्ताची आण घेऊनच आम्ही लढ्यात शिरलो! आणि एक दिवस असा आला की क्रांतीच्या यशस्वितेचा क्षण अगदी हाकेच्या अंतरावर येऊन ठेपला....सगळी जय्यत तयारी झाली .. अचानक उठावाची सिद्धता झाली.... सगळं सगळं पोखरलं गेलं होतं....फक्त एका जबरदस्त दणक्याची आवश्यकता होती आणि त्याची तयारीही होतीच! पण मी त्या संघटनेतून बाहेर पडलो!

नादज : ऐन वेळी? ही दगाबाजी झाली आजोबा! ज्या संघटनेच्या कामासाठी माझ्या बाबांसारख्या अनेकांनी आपले प्राण खर्ची घातले, त्या संघटनेच्या ऐन विजयाच्या क्षणाशी तुम्ही बाहेर पडलात?

मगज : (खिन्नपणे हसत) बरोबर आहे....दगाबाजी! हाच आरोप त्यावेळी अनेकांनी माझ्यावर केला ... आणि 'क्रांतिसूर्य' संघटनेतले अनेक सभासद आजही करीत आहेत. पण ती दगाबाजी नव्हती नादज, संघटनेच्या मूळ उद्दिष्टांशी प्रामाणिक

राहण्याचा प्रयत्न होता तो !

नादज : म्हणजे ? असं काय घडलं होतं की स्वतःच्या घामाचं शिंपण करून वाढविलेली संघटना तुम्ही मोक्याच्या क्षणी सोडावी ? क्रांती हेच संघटनेचं मूळ उद्दिष्ट होतं ना ?

मगज : तेच मी तुला मघाशी सांगत होतो. क्रांतीचा क्षण एवढंच उद्दिष्ट आमच्या मनात नव्हतं. त्यानंतर येणारी शासनव्यवस्था सर्वसामान्यांची अपायला हवी होती. मागच्या शासनव्यवस्थेतली राजेशाही नष्ट होऊन लोकशाहीच्या तत्त्वांवर त्याची उभारणी व्हायला हवी होती.

नादज : ( चिडल्यासारखा ) छे ! अगदी किरकोळ प्रश्न होता– राजेशाही नष्ट व्हायची वेळ आली होती तर तुम्ही ती होऊ तरी द्यायला हवी होती. नंतरच्या शासनाची मांडणी पुढे करता आली असती !

मगज : तसं कधी होत नाही बेटा ! बुद्धिमान लोक आपापल्या; पुढे निर्माण होणाऱ्या; जागा आधीच स्वतःसाठी हेरून ठेवतात. त्या दिशेनं प्रयत्न करतात...त्यासाठी पटापटा स्वतःची तत्त्वं गुंडाळून ठेवतात आणि नंतर फक्त एक राजेशाही जाऊन दुसरी राजेशाही येते. ज्या भाबड्या जनतेसाठी हा सगळा उपद्व्याप केला ...त्यांच्याकडून रक्त आणि घामाची मागणी केली, ती जनता तिथेच राहते. फक्त एक राजवट जाऊन दुसरी येते !

नादज : पण, म्हणजे क्रांतिसूर्यानं...

मगज : नाही, सबंध संघटनेनं नाही, पण त्यांतल्या प्रमुख मंडळींनी आणि विशेषतः कर्मकानं असाच घाट घातला होता. क्रांतीनंतर प्रस्थापित होणाऱ्या शासनव्यवस्थेचा आराखडा मला थोडा आधी पहायला मिळाला. त्यात राज्यकारभार पाहण्यासाठी जी सर्वोच्च जागा होती त्या अधिकाऱ्याला ' लोकनेता ' म्हटलं होतं.

नादज : अगदी योग्य उपाधी होती !

मगज : पण राजा व्याघ्रसेनाचे सर्व अधिकार, सर्व सुखसोयी आणि सर्व सवलती या लोकनेत्याला कायम ठेवण्यात आले होते. प्रधानपदाचं नाव ' लोकसचिव ' झालं होतं. ज्या जागेवर माझी नेमणूक

होणार होती. पण प्रधानाच्या महालासकट, अंगवस्त्रांसकट सर्व गोष्टी या सचिवासाठी कायम करण्यात आल्या होत्या.

नादज : म्हणजे फक्त पदांची नावं बदलत होती?

मगज : अगदी बरोबर! व्याघ्रसेन महाराज जाऊन कर्मक महाराज येणार होते इतकंच!

नादज : तुम्ही संघटनेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतलात ते अगदी योग्यच होतं, आजोबा!

मगज : त्यामुळे संघटना विस्कळीत झाली, विचलित झाली आणि अपेक्षित क्रांतीनं कधी मूर्त स्वरूप घेतलंच नाही! शासन-व्यवस्थेतल्या उठावाची मुळं व्याघ्रसेनाच्या हेर खात्याच्या लक्षात आली आणि त्यांनी ती अगदी वेचून वेचून ठेचून काढली! परत सगळं गमभनपासून सुरुवात करण्याची पाळी आली!

नादज : पण आजोबा, 'क्रांतिसूर्य' तशीच बलवान राहिली आणि आपल्या 'नवक्रांती' संघटनेचं मनुष्यबळ अगदीच कमी आहे...

मगज : नवक्रांती ही संघटना नवजात आहे बेटा! यशकेतूसारखी जीवाला जीव देणारी माणसं या झेंड्याखाली एकत्र यायला थोडा वेळ लागेल शिवाय मीही माणसांच्या निवडीबाबत जरा काटेकोर आहे... नव्यानं प्रवेश करणाऱ्यात कुणी कर्मक असू नये, ही काळजी डोळ्यांत तेल घालून घ्यावी लागते... आणि 'क्रांतिसूर्य'च्या बाबतीत म्हणशील तर त्या सगळ्या मंडळींच्या हातातोंडाशी आलेला घास गेला आणि तो माझ्यामुळे गेला, हे अगदी सूर्यप्रकाशाइतकं स्पष्टपणे दिसलं...सगळ्या सभासदांचा तसाच समज झाला आणि तो गैरसमज कायम करण्यात कर्म-काला यशही मिळालं! म्हणूनच म्हटलं की कर्मक बुद्धिमान आहे. दुसऱ्या कोणाचा तरी जीव भरीला घालून आपलं ईप्सित कसं साध्य करून घ्यायचं, हे त्याला फार चांगलं समजतं! आणि तेसुद्धा बेटा, जीव देणाऱ्याच्या खुषीनं! त्याला वाटतं, आपण थोर आहोत, हुतात्मा आहोत! या आनंदातच तो हसत हसत मृत्यूला सामोरा जातो आणि सबंध पट जिंकायचा म्हणजे

अशी एखादी सोंगटी दान द्यावीच लागते या विचारातच कर्मक आणखी पुढचा टप्पा गाठतो !

नादज : पण आजोबा, तुम्ही तर आता आपल्याही संघटनेचं नेतेपद सोडलंय ! मग तुम्हाला आयुष्यात काय मिळालं ?

मगज : माझ्या आयुष्यातच काहीतरी मिळावं म्हणून मी या कामात उडी नाही घेतली, नादज ! आज ना उद्या इच्छित साध्य होईल...तुला नाही मिळालं तर तुझ्या मुलांना मिळेल... पण कुणीतरी उठून, कुठेतरी हे सुरू करायलाच हवं असतं बेटा ! आता हे सगळं तुम्हीच सांभाळायचं आहे...आता उरलोय तितके दिवस चार अनुभवाच्या गोष्टी सांगेन इतकंच !

नादज : शारंभकाका तुमच्याच तालमीत तयार झालेत ! एकेक शब्द म्हणजे बाणासारखा सणसणत येतो त्यांचा आणि थेट काळजात खोलवर घुसतो.

मगज : शारंभाची तळमळ अस्सल आहे. पण जरा उतावळा आहे. छोट्या छोट्या गोष्टींनी भारावून जातो....नको इतका दिलदारही आहे ! पण हरकत नाही. हे चालायचंच ! बेटा, नादज, मी तुला एकेक गोष्ट सांगतोय ते तू नीट लक्षात ठेवतोयस ना ! त्याचा तुला फार उपयोग होणार आहे... माझ्या स्वच्छ विचारांचं एक मूळच मी तुझ्या ठायी रुजवतोय. त्याचा भला मोठा वृक्ष व्हायला पाहिजे...लक्षात ठेव, आपली संघटना मोठी नाही, निदान आज तरी ! पण तुझ्यासारखे कट्टर तरुणच ती मोठी करणार आहेत ! या म्हाताऱ्याचे शब्द आणि हे विचार नीट लक्षात ठेव.

[ याच वेळी शारंभ नावाचा तरुण नेता मोठ्या उत्साहाने आत येतो. त्याच्याबरोबर रावस, यमन, समित ही इतरही सभासद मंडळी आहेत. आणखी एका नव्या सभासदाला, 'विधित'ला घेऊन ते प्रथमच या गुप्त जागी येत आहेत. विधितच्या वावरण्यात नवखेपणा दिसतो. ]

शारंभ : वंदन करतो, बाबा !

मगज : यशमान व्हा !

शारंभ : बाबा, या व्याघ्रसेनाच्या राज्यात आपली पावलं पुढे पडायला काहीच्च अडचण येत नाही.

मगज : म्हणजे ?

शारंभ : सगळीकडे भ्रष्टाचार माजलाय. व्याघ्रसेनाच्या संरक्षक दलात तीन दिवस फिरलो. नुसतं थैलीचं तोंड मोकळं सोडल्याबरोबर चारजण फितले...अगदी लाचार झाले. संरक्षणव्यवस्थेची खडान् खडा माहिती घेऊन आल्येय.

मगज : सबूर....शारंभा, सबूर ! जरा बोलताना काळजी घे.

शारंभ : आपल्याच या गुप्तस्थळी बोलताना कसली काळजी ?

मगज : आपल्याच या गुप्तस्थळी आज मला एक नवा चेहरा दिसतोय !

शारंभ : ओहो ! तुम्हाला सांगायचं राह्यलं– विधित, इकडे ये.
(विधित पुढे येतो)
बाबा, हा विधित.. चेहरा नवा दिसतो हे तुम्ही बरोबर ओळखलंत. पण हा आपला नवा मित्र आहे. सच्चा क्रांतिकारक !

विधित : वंदन करतो, बाबा !

मगज : या सगळ्या तरुणांच्याप्रमाणे तूही मला 'बाबा' म्हणालास ! पण असं क्षणात नातं कसं जोडलंस रे ?

विधित : तुमच्याविषयी इतकं ऐकलंय ना, की दुरावा असा राहिलाच नाही. शिवाय तुमच्या या क्रांतिकार्यावर माझं मनस्वी प्रेम आहे. त्यासाठी प्राण अर्पण करण्याची माझी तयारी आहे.

मगज : नाही, हे सगळं ठीक आहे...पण कुठला तू ? कुठे होतास ?

विधित : लष्करात होतो.

रावस : लष्कराच्या नोकरीवर लाथ मारून आला तो क्रांतिकार्यासाठी !

विधित : मला त्या राजेशाहीतले जुलूम, अन्याय सहन झाले नाहीत. या अन्यायाला तोंड कसं फोडावं, राजेशाही उलथवून देण्यासाठी एखादी बलवान संघटना कशी स्थापन करावी याच विचारात होतो मी. तेवढ्यात नवक्रांतीच्या तरुण नेत्याशी ओळख झाली. शारंभ, रावस, यमन वगैरे सगळे भेटले... त्यांनी मला भारून

टाकलं आणि सगळ्या परीक्षा घेतल्यानंतर आज तुमच्या पायांशी आणलं !

मगज : ' पायाशी आणलं ' वगैरे शब्दांची आतषबाजी नको ! मला एक सांग, लष्करातून तू बाहेर पडलास—तुला शासनानं जिवंत कसं सोडलं ?

विधित : लष्करी तुरुंगातून पळून आलो मी !

मगज : म्हणजे हुशार आणि धाडसी आहेस...पण प्रामाणिक आहेस, याचा काय पुरावा ?

विधित : ( थोडासा गडबडून ) पण मी माझी लष्करातली नोकरी...

मगज : नाही—नाही— तो लष्कराशी अप्रामाणिक असल्याचा पुरावा झाला !

शारंभ : नाही बाबा, असं बोलू नका....त्यामुळे तरुणांची मनं दुखावतील. विधिताची क्रांतिकार्याची तळमळ खरी आहे, याची आम्हाला खात्री वाटते !

मगज : त्याचाच पुरावा मी विचारतोय ! तुम्हा तरुणांची मनं अलीकडे मजबूत बनण्याऐवजी जास्तीत जास्त नाजूक बनत चालली आहेत. साध्या साध्या गोष्टींनी दुखावतात !

रावस : मग ती पुराव्याची गोष्ट आम्ही सांगतो.

मगज : असं ? बोला.

रावस : परवा आम्ही लपत छपत विधिताच्या घरी गेलो होतो. त्याच्या आईनं प्रथम त्याला जवळ घेतला आणि नंतर मग, ' राजाची नोकरी सोडून का पळालास ' याचा जाब विचारला. त्या वेळी त्यानं प्रत्यक्ष जन्मदात्या आईला जे मनाच्या तळापासून ढवळून, तडफदार उत्तर दिलंय ते ऐकायला आम्ही स्वतः तिथे होतो !

मगज : बस् ? आणि एवढ्यावरून... ?

यमन : नाही ! एवढ्यावरूनच नाही ! त्याचं उत्तर ऐकूनही त्याच्या आईचं समाधान झालं नाही. ती म्हणाली की, मी स्वतः व्याघ्रसेन महाराजांच्या पायी जाऊन त्यांची क्षमा मागते. माझ्या जीवात जीव असे तोपर्यंत मी तुला राजाच्या पदरी रुजू झालेला

पहाणार आहे ! आणि यावर काय घडावं ?

मगज : काय घडलं ?

शारंभ : विधितानं देवघरात टांगलेली पूजेची तलवार काढली आणि स्वतःच्या हातानं, स्वतःच्या आईचं मस्तक एका क्षणात धडावेगळं केलं !

मगज : हं ऽ ऽ ! मी तुम्हाला त्याच्या क्रांतिकार्याच्या प्रामाणिकपणाचा पुरावा विचारतोय आणि तुम्ही त्याचं धाडस, अप्रामाणिकपणा, शौर्य आणि क्रौर्य याचे पुरावे देता आहात !

नादज : पण आजोबा, स्वतःच्या आईचं मस्तक छाटून टाकणाऱ्या माणसाकडून आणखी काय पुरावा हवा आहे ?

मगज : सगळ्या प्रश्नांची उत्तरं सगळ्याच वेळी मोकळेपणानं देता येत नाहीत, नादज !
(विधित पुढे येतो. मगजासमोर उभा राहतो)

विधित : सगळ्याच गोष्टींचे पुरावेही देता येत नाहीत, बाबा ! ते देता आले असते तर जगातल्या यच्चयावत न्यायालयातून खरोखरच न्याय मिळाले असते...पण हरकत नाही.... (कमरेच्या पट्ट्यात लटकावलेली कट्यार काढतो आणि पाहता पाहता आपल्या उजव्या हातानं, डाव्या हाताची करंगळी सटकन उडवतो... सगळे अवाक् होतात. हाताला रक्ताची धार लागते. तो कापलेली करंगळी उचलतो आणि मगजाच्या पायाशी ठेवतो.) माझ्या शरीराचा हा लहानसा तुकडा माझ्या रक्तासकट मी आपल्या पायांशी या क्रांतिकार्यासाठी अर्पण केला आहे. क्रांती व्हावी आणि प्रस्थापित राजसत्तेचा नायनाट व्हावा, हे एकच स्वप्न माझ्या मनात आहे. याचा यापेक्षा आणखी काहीही पुरावा मी देऊ शकत नाही—क्षमा करा ! आता मला आपल्यात सामील करून घ्या किंवा बाहेर काढा.
(सगळे 'विधित, विधित' अशा हाका मारीत, एका वेगळ्याच आपुलकीनं त्याच्याभोवती जमतात. मगज थोडासा त्या कोंडाळ्यापासून बाजूला जातो आणि सावकाश सांगतो—)

मगज : जा—त्याला औषधपाणी करा !
(सगळे विधिताला घेऊन आतल्या बाजूला जाऊ लागतात)
शारंभ, तू जरा थांब.
(शारंभ थांबतो. बाकीचे आत जातात)
शारंभ, त्या पोरानं आपलं रक्त सांडलं...तो स्वतःचे प्राणही गमवायला मागे-पुढे पाहणार नाही !

शारंभ : आता तरी तुमची खात्री पटली ना, बाबा ?

मगज : कशी पटणार शारंभ ! हा आततायीपणा झाला. इतक्या कमी परिचयामध्ये तुम्ही त्याला थेट आपल्या तळावर आणायला नको होता !

शारंभ : आता यावर मी तरी काय बोलणार ?

मगज : काहीही बोलू नकोस. शेवटी नियतीच्या मनात असेल तेच होणार ! फक्त एक काम कर—या विधिताची सगळी माहिती मला आणून दे. तो कुठला, कोणाचा मुलगा, कुठे शिकला, कोणाकडे शिकला— सगळं सगळं मला माहिती व्हायला हवं आहे !

शारंभ : थोड्याच दिवसांत मी ही माहिती काढतो. अगदी सविस्तर !

मगज : झालं ते बरोबर नाही. (सुस्कारा सोडून) असो.

[मगज आपल्या वाचनाच्या जागेवर जातो. शारंभ आश्चर्याने आणि थोड्याशा खेदाने त्याच्याकडे पहात उभा. याच वेळी अंधार होतो.]

## (प्रवेश दुसरा)

[शारंभ, रावस, यमन, समित आणि विधित खलबतं करीत बसले आहेत. त्यांच्या समोर एक जुनाट कागद पसरलेला.]

समित : या रस्त्याला तीन आडवे रस्ते फुटतात. हे पाहा—( समोरच्या कागदावर, म्हणजे नकाशात दाखवीत ) हा पहिला, हा छोटासा दुसरा आणि हा तिसरा— मी अनेक वेळा गेलो आहे तिथून.

विधित : पळायला जागा अनेक आहेत, समित. पण मी त्यासाठी या जागेची निवड नाही केली...

शारंभ : व्याघ्रसेनाची मिरवणूक ज्या रस्त्यावरून जाणार आहे, त्या रस्त्यावरचा हा सर्वात सुरक्षित भाग आहे. अर्थात सुरक्षित म्हणजे आपल्या दृष्टीनं.. व्याघ्रसेनाच्या नाही!

विधित : ते तर झालंच....पण आपल्या योजनेप्रमाणे दोन बाजूंनी गोळी चालवली जाणार. व्याघ्रसेनाचे संरक्षक चक्रावून जाणार. नेमकं कोणाच्या मागे पळावं, हे त्यांना समजणार नाही. त्यांच्या गोंधळाच्या त्या क्षणातच-रस्त्याच्या डाव्या हाताला हे जे दोन रस्ते फुटतायत ( नकाशा दाखवीत ) त्यांपैकी पहिल्या रस्त्यातून रावस, यमन, समित पळतील–दुसऱ्या रस्त्यानं वसुद आणि यराक पळतील. एक लक्षात ठेवायचं–या पाचही जणांजवळ कोणतंही शस्त्र नसेल. हातातल्या पिस्तुलानं गोळी चालवणारा शारंभ मात्र पटकन उलटा गर्दीत मिसळेल. संरक्षक पळणारांच्या मागे जातील आणि रस्त्याच्या उजव्या हाताला जो रस्ता फुटतो...

शारंभ : थांब विधित....मी पहिल्यापासून सांगतोय की मी जिथे उभं रहायचं ती जागा प्रत्यक्ष मिरवणुकीपासून लांब आहे. अद्ययावत शस्त्र असल्याखेरीज इतक्या अंतरावरून गोळीचा नेम लागणं अशक्य आहे.

विधित : त्याची गरजही नाही. तुझ्या पिस्तुलाचा नुसता आवाज झाला तरी चालेल...रस्त्याची ही डावी बाजू केवळ दिशाभूल करण्यासाठी आहे. गोंधळ उडवून देण्यासाठी आहे! आणखी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवायची आणि आपल्या सगळ्या सहकाऱ्यांनाही बजावून बजावून सांगायची... हा सगळा प्रकार होताच दहा मिनिटांत सगळे सभासद आपल्या याच जागी हजर हवेत...ही जागा अत्यंत गुप्त आहे.—इथवर कोणी येणार

नाही. ठरल्याप्रमाणे वेगवेगळ्या मार्गांनी सगळ्यांनी इथं यायचं आहे.

शारंभ : माझ्या गोळीनं जर...

(याच क्षणी मगज बाहेरून 'शारंभ–शारंभ' असा ओरडत, संतापून प्रवेश करतो.)

मगज : शारंभ, माझ्या पाठीमागे हे काय चाललंय?

शारंभ : काय झालं, बाबा?

मगज : नादज सांगत होता की तुम्ही व्याघ्रसेनाच्या वधाची योजना केली आहे. मिरवणुकीत राहून गोंधळ माजवण्याची जबाबदारी त्याच्यावरही टाकलीय म्हणे. कोणाची ही योजना? कोण करणार आहे हे सगळं?

शारंभ : योग्य वेळी तुम्हाला सांगणारच होतो, बाबा!

मगज : योग्य वेळी म्हणजे कधी? तुम्ही सगळा मूर्खपणा करून झाल्यावर?

शारंभ : तसं नाही बाबा...

मगज : तसं नाही तर मग कसं? मी इतका निरुपयोगी म्हातारा झालो की माझ्या संघटनेत क्रांतीचा एवढा मोठा कट शिजावा आणि माझ्या कानावर घालण्याची खबरदारीही कुणी घेऊ नये!

शारंभ : गैरसमज करून घेऊ नका, बाबा! आज–उद्या मी तुमच्या कानावर घालणारच होतो...

मगज : व्याघ्रसेनाचा वाढदिवस परवा आहे. त्या वेळी हा सगळा प्रकार करणार आणि आज–उद्या माझ्या कानावर घालणार होता! माझ्यापासूनही एवढी गुप्तता कशासाठी? नाही शारंभा, यात आणखी काहीतरी मोठा डाव आहे.

रावस : डाव तसा काही नाही, बाबा... विधितानं सांगितलं...

मगज : बरोबर आहे! आता माझ्या लक्षात येतंय... विधितानं सांगितलं! ही सगळी योजना विधिताची असणार ... माझ्या कानावर न घालण्याची योजनाही नक्की त्याचीच—

शारंभ : कल्पना कुणाचीही असो. पण ही योजना मात्र दाद द्यावी अशी



क्र. २३७७८ ता. १२६

आहे ... आपलं क्रांतीचं स्वप्न एका क्षणात पूर्णत्वाला नेणारी आहे.

मगज : राजेशाहीची उलथापालथ होईल, हे कबूल ...पण कोणाचं स्वप्नं पूर्णत्वाला जाणार आहे? अरे, फक्त माणसं मारून क्रांती होत नसते नंतरच्या शासनाचं काय?

विधित : त्याचाही विचार जवळ जवळ पूर्ण झालाय, बाबा!

मगज : तो तू नक्कीच केला असशील! व्याघ्रसेनाच्या जागेवर लोकनेता विधित येणार असेल.

विधित : नाही, सबंध जनतेचं राज्य असेल!

मगज : आणि ते चालवणार तू?

विधित : तुम्ही विनाकारण आगपाखड करता आहात, बाबा माझ्यावर! या योजनेतला सर्वांत कच्चा दुवा असा आहे की खुनी सापडणार आहे...त्याला पळायला एकच रस्ता आहे...आणि त्या रस्त्यावर उभं राहून व्याघ्रसेनाचे प्राण घेणारी गोळी मी स्वतः चालविणार आहे!

शारंभ : विधित!—म्हणजे!
रावस : हे तू मला...काय हे!
यमन :

(किंचित गडबड होते.)

शारंभ : मला वाटलं, की त्या जागी तू अन्य कोणाची तरी योजना करणार!

विधित : मी क्रांतीचा सेनानी आहे, शारंभ! सहज सुटता येईल अशा जागी स्वतः बसण्याचा भ्याडपणा मी कधीच करणार नाही!

रावस : पण मग हे आधी का सांगितलं नाहीस?

विधित : आधी सांगून काय फरक पडला असता?

रावस : आमच्यापैकी कुणीतरी, तसं कशाला, मीच ती जोखीम अंगावर घेतली असती!

मगज : वाः! इथे हुतात्मा होण्याची प्रत्येकालाच घाई झालेली दिसतेय! (अचानकपणे संतापून ओरडतो) मूर्ख! मूर्ख आहात तुम्ही!!

वर्षानुवर्षं आखणी करीत एखाद्या डावाची मांडणी आम्ही करीत होतो, स्वतःची सगळी आयुष्यं त्यासाठी पणाला लावीत होतो, ते आम्हाला वेडं लागली होती म्हणून नाही! इतकी वर्षे शासनव्यवस्था सांभाळणारा कोणताही राजा जुलमी असेल, भ्रष्टाचारी असेल, पण तुमच्याइतका मूर्ख कधीच नसतो! तुमच्यासारख्या चार आततायी तरुणांच्या हातून, दोन–चार क्षणांत उद्ध्वस्त होईल इतकी शासनयंत्रणा कमकुवत नसते! बुद्धी गहाण टाकलीत आणि राज्यशासन उलथवण्याचे प्रयोग करता आहात. सगळं तरुण रक्त फुकट वाया जाणारं आहे. क्रांतीचा इतका का सोपा अर्थ आहे आणि तो कुणी शिकवला तुम्हाला? मला माफ करा, मला माफ करा पोरांनो... माझ्या आयुष्यातली ही दुसरी वेळ आहे. पण मी तुम्हाला सोडून जाणार नाही... तुमच्याबरोबर माझं काय व्हायचं ते होईल . काय व्हायचं ते हो, दे...(संतापानं थरथरत शेवटची वाक्य उच्चारीत मगज बाहेर पडतो...हा सगळा संताप सगळे पहातच राहतात... आणि अंधार होतो.)

## प्रवेश ३ रा

(पहिल्या प्रवेशाप्रमाणे मगज वाचीत बसलेला .... घाईघाईनं नादज येतो.)

नादज : मिरवणूक जागेपाशी आली आजोबा, आत्तापर्यंत कदाचित गोळीबार झालाही असेल, तुमच्या सांगण्याप्रमाणे मी त्या गोंधळात भाग नाही घेतला...आणखी काय सांगणार होता तुम्ही मला?

मगज : हो! नीट ऐक–आत्ता ताबडतोब, या क्षणी गावाच्या विरुद्ध दिशेनं निघून जायचं—आणखी सहा महिने इकडे फिरकायचं

देखील नाही !

नादज : पण आजोबा...

मगज : या वेळी कोणतीही शंका विचारायची नाही ! लगेच नीघ... मागं वळूनही पाहू नकोस.. आणि बेटा ( जरासे भारावून ) मी सांगितलेलं सगळं लक्षात आहे ना? माझी शिकवण विसरू नकोस !

नादज : पण मग आजोबा, आता आपली गाठ...

मगज : सर्वसामान्य संसारी माणसांचे प्रश्न विचारू नकोस ! चल जा–

[ मगजाला वंदन करून नादज त्वरेनं बाहेर पडतो. क्षणकाल मगज त्या दिशेनं बघत राहतो...मग परत वाचनात लक्ष घालण्याचा प्रयत्न करतो...थोड्याच वेळात यमन, रावस, समित वगैरे मंडळी पळत पळत येतात. ]

रावस : खलास ! बाबा, मुडदा पडला–राजसत्ता उलथून पडली !

मगज : शारंभ कुठेय ?

यमन : तो लष्करी सत्ता जाहीर करण्याची तयारी करतोय. लष्कराला आधीच फितवलं होतं !

मगज : अरे, हाताच्या बोटावर मोजण्याएवढी माणसं आपण....कोणत्या वेळी काय गोंधळ केलात...आपली शक्ती ती काय ! ( दचकून ) आणि...आणि तुमचा तो नेता कुठाय ?

समित : विधित ? तो येतच असेल....बरोब्बर नेम साधला त्यानं.

रावस : पण मी मागे वळून पाहिलं तेव्हा तीनचार शिपाई त्याच्याच पाठलागावर होते...

( धडपडत धडपडत विधित येतो....)

विधित : मी हजर आहे, बाबा ! व्याघ्रसेन राजा कोसळला....राजसत्ता नष्ट झाली...आपल्या देशात क्रांती झाली...तुमचं एक स्वप्न साकार झालं.

( अचानकपणे धडपडतो. मगज सोडून सगळे त्याला सावरायला 'विधित–विधित' म्हणत पुढे जातात. )

रावस : तुला काय झालं विधित ?

विधित : दुसरं काय होणार ? गोळ्यांनी चाळणी केलीय माझ्या शरीराची ! ( मगजाचा थरकाप होतो...तो जवळ जाऊन, धडपडणाऱ्या विधिताच्या गळ्याजवळ पकडतो आणि त्याला उभा करीत म्हणतो—— )

मगज : मग तू इथपर्यंत का आलास ? पाठीवर गोळ्या आणि त्या मागे सैनिक घेऊन तू या गुप्त जागेपर्यंत का आलास ?

( वेदनांनी तळमळणारा विधित हसतो. )

हसू नकोस ! का आलास ?

( बाहेर प्रचंड आरडाओरडा ऐकू यायला लागतो...तो जवळ येतो. )

रावस : हा ओरडा कसला ?

मगज : मी जीव तोडून सांगत होतो ते पटलं नाही ! आता हा ओरडा कसला ते विचार तुझ्या ह्या निष्ठावान क्रांतिवीराला !

विधित : माझ्याजवळ उत्तर आहे रावस ! हे माझ्या पाठीवरचं राजाचं सैन्य आहे ...( आरडाओरडा जवळ येतो. )

रावस : पण मग त्यांना तू चुकवायला हवं होतंस...इथे तू यायला नको होतंस !

विधित : आपल्या संघटनेतल्या एकूण एक कार्यकर्त्यांनी इथंच यायचं ठरवलं होतं ना ? बघ, सगळे जमा झालेत !

मगज : दगाबाज ! स्वतःबरोबर सबंध ' नवक्रांती ' संघटनाच नष्ट व्हावी, अशी ही योजना आहे ना ? पण माझा शारंभ बाहेर आहे.

विधित : त्याला राजवाड्यातच मारण्याची व्यवस्था झालीय, बाबा ! ( आरडाओरडा वाढतो. )

मगज : म्हणजे राजवाड्यात आता...

विधित : बरोबर...राजवाड्यात आता कर्मक महाराजांचं राज्य चालू झालं आहे... ' क्रांतिसूर्य ' संघटनेचं शासन आपल्या देशात लागू झालं आहे.

रावस : ( विधिताला झापडीत ओरडतो ) हरामखोर ! नवक्रांतीच्या

सहाय्यानं, राजसत्ता उलथवून, नवक्रांतीलाही संपवण्याचा डाव खेळलास तू !

विधित : मी...नाही ! कर्मक महाराज ! मी केवळ सैनिक आहे...क्रांति-यज्ञातला एक हुतात्मा !

( धाडकन पडतो. मान टाकतो.
मगज त्याच्याजवळ जातो आणि ओरडतो. )

मगज : विधिता, अजून प्राण गेले नसतील तर ऐक ! मी नादजाला केव्हाच बाहेर पाठवलाय...तो तुम्हाला इथं सापडणार नाही... नव्या क्रांतीची बीजं त्याच्या ठायी जोपासलीत...त्याला ती क्रांती आता कर्मकाच्या शासनाविरुद्ध करावी लागणार आहे....आणि तो ती करील....माझी खात्री आहे !

[ याच वेळी लष्करी गणवेष घातलेले....हातात बंदुका घेतलेले सैनिक सर्व बाजूंनी तळघरात उतरू लागतात...प्रकाश मंद होत जातो.... एकेक गोळीचा आवाज येतो आणि एकेक कोसळत जातो....
याच वेळी पडदा खाली येत असतो. ]

# ४. दुहेरी

[ सरकारनियुक्त मानसशास्त्रज्ञ ( सायकॅट्रिस्ट् ) श्री. खरे यांच्या दवाखान्यातली एक खोली. संपूर्ण पांढरा स्वच्छ रंग भिंतींना दिलेल्या या खोलीत आरामखुर्चीसारखी एक प्रशस्त खुर्ची आहे. या खुर्चीच्या समोर फोटोग्राफर वापरतात तसा एक अत्यंत प्रखर प्रकाशाचा दिवा आहे. या दिव्याचा प्रखर झोत त्या खुर्चीत बसलेल्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर टाकता येईल.
पडदा उघडतो तेव्हा मोहन हा साधारणपणे पंचवीस ते तीस या दरम्यान वय असलेला तरुण खुर्चीत बसला आहे. त्याच्या चेहऱ्यावर हा प्रखर प्रकाशाचा झोत टाकलेला आहे आणि तो अत्यंत केविलवाणा होऊन या सगळ्या प्रकाराला तोंड देण्याचा प्रयत्न करतो आहे... त्याच्या डाव्या हाताला इन्स्पेक्टर सावंत उभे आहेत आणि समोरच्या खुर्चीत डॉ. खरे बसलेले आहेत. खऱ्यांच्या हातात नोटबुक, पेन इ. आहे. ]

मोहन : प्लीज–प्लीज हा दिवा बंद करा. मला त्याचा त्रास होतो आहे.

खरे : अरे ! तुला त्याचा त्रास होतोय होय ! मला वाटलं, आवडेल तुला हा प्रखर प्रकाशाचा झोत !

मोहन : नाही साहेब, आवडतोय कसला ! त्यानं माझ्या मेंदूत झिणझिण्या उठतायत–खरंच, बंद करा तो. प्लीज.

खरे : करू हां... जरूर करू. पण तू काही बोलतच नाहीस !

सावंत : बोल, तू शेखर देशपांडेचा खून कां केलास ?

खरे : इन्स्पेक्टर, प्लीज– असं करू नका– घाई करू नका. मला माझ्या मेथडनं जाऊ द्या. दॅट विल हेल्प यू !

सावंत : आय ॲम सॉरी ! पण इतका वेळ आपण खडा पहारा देतो आहोत. तुमच्या पेशन्सचं तर मला कौतुकच वाटतंय ! एवढं

सगळं करूनही आपल्या पदरात क़ाहीच पडत नाही.

खरे : असं उतावळं होऊन कसं चालेल सावंतसाहेब ! आत्ता कुठं आपण चौकशीच्या जवळपास येतो आहोत ! त्याला बोलता करायला पाहिजे.

मोहन : माझ्याकडे काहीही बोलण्यासारखं नाही. मला काहीही माहिती नाही. तुम्ही लोकांनी मला गरिबाला पकडून छळ कां चालवलाय तेच मला समजत नाही ! प्लीज, सोडा हो मला...माझी आई माझी वाट पहात असेल !

खरे : तुझ्या आईला माहितीय तू इथे आहेस ते. मी तिला सांगून आलोय की मोहनची अजिबात काळजी करू नका.

मोहन : तुम्ही कोण आहात ?

खरे : तुझा मित्र !...तुला आराम वाटावा म्हणून तर माझी ही धडपड चाललीय.

मोहन : मग तेवढा दिवा बंद करा ना— मला खरंच त्याचा फार त्रास होतोय हो !

खरे : ओ के– ओ के ! तुझ्यासाठी आम्ही एवढं सुद्धा करणार नाही असं कसं वाटलं तुला ? हा बघ, दिवा बंद झाला !

[ डॉक्टर दिवा बंद करतात. आता नेहमीच्या प्रकाशानं रंगमंच उजळतो. ]

मोहन : थँक यू सर—थँक यू व्हेरी मच ! ( क्षणभरानं ) सर, तुम्ही डॉक्टर असणार असं मला मघापासून वाटतंय...

खरे : अगदी बरोबर आहे तुझी शंका...मी डॉक्टरच आहे.

मोहन : पण मग मला इथं का आणलंय ? मला तर काहीही होत नाही !

खरे : तसं नाही मोहन. तू तसा धडधाकट आहेस. पण काही आजार केवळ शरीराचे नसतात, मनाचे असतात आणि आपलं मन आजारी आहे याचा आपल्याला पत्ताच नसतो !

मोहन : माझं मन वगैरे काही आजारी नाही, मला खात्री आहे.

खरे : आम्हालाही तसंच वाटतं.

सावंत : मोहन, तू शेखर देशपांडेचा खून कां केलास ?

मोहन : डॉक्टर, हे कोण आहेत ?

खरे : हे इन्स्पेक्टर सावंत आहेत.

मोहन : मग हे शेखरबद्दल असं का विचारतायत ?

सावंत : म्हणजे तुला त्याबद्दल काहीही माहिती नाही, असा तुझा दावा आहे ?

मोहन : त्याबद्दल म्हणजे कशाबद्दल ?

सावंत : अस्सं ! तुझ्यावर दवाखान्यात नाही उपचार होणार...तुला आमच्याच ताब्यात घ्यायला हवा.

खरे : नाही सावंतसाहेब, असं चिडून उपयोग नाही. मोहन या सगळ्या गोष्टी मुद्दाम करीत नाही !

सावंत : आय ॲम सॉरी डॉक्टर ! मी तुमच्याशी सहमत नाही....हा निढावलेला आहे. भोळेपणाचं सोंग घेऊन बसलेला जबरदस्त गुन्हेगार आहे. तुम्ही त्याला वाचविण्याची धडपड विनाकारण करता आहात !

मोहन : हे सगळं माझ्याबद्दल चाललंय ?

सावंत : मग तुला काय वाटलं, मी माझ्याबद्दलच बोलतोय ? मोहन, तू जास्त शहाणा बनायची कोशिश करू नकोस. आज या ठिकाणी तुला ज्या काही गमजा करायच्यात त्या करून घे. पण शेवटी तुला आमच्याच ताब्यात यायचंय ! एकदा आमच्या ताब्यात आलास की पोपटासारखं घडाघडा कसं बोलायचं ते आम्ही तुला शिकवू !

मोहन : इन्स्पेक्टर, तुम्ही काय बोलता तेच मला कळत नाही.

सावंत : तेच म्हणतोय मी ! आत्ता तुला जरी काही कळत नसलं तरी नंतर सगळं काही स्वच्छ कळायला लागेल ..तशी व्यवस्था आहे आमच्याकडे !

मोहन : डॉक्टर, व्हाय धिस फेलो इज टॉकिंग लाइक अ फूल ?

सावंत : ( रागारागाने उठत ) साल्या !

खरे : सावंतसाहेब, प्लीज ! तुम्ही शांत बसलात तरच मला माझं काम करता येईल... तुम्हाला त्याला जे काही विचारायचं आहे तेच

मलाही विचारायचं आहे. पण असं एकदम हमरीतुमरीवर येऊन, काहीही मिळणार नाही!

सावंत : कायदा आडवा आला हो ऽऽऽ! नाहीतर आत्तापर्यंत याचा कबुलीजबाब मी नोंदवून घेतला असता!

खरे : पेशंट माझ्या ताब्यात असेपर्यंत, माझ्या परवानगीशिवाय तुम्हाला तसं काहीही करता येणार नाही!

सावंत : तेच म्हणतोय मी....कायदा आडवा आलाय!

(क्षणभर स्तब्धता)

खरे : मोहन, तुला आता कसं वाटतंय?

मोहन : मला काय झालंय? आय ॲम क्वाइट् ऑल राईट. फक्त तुमचा तो दिवा त्रास देत होता म्हणून मी जरा अस्वस्थ होतो...आता मी ठीक आहे. एनी वे, थँक्स!

सावंत : वाः! अगदी शिळोप्याच्या गप्पा चालल्यात! डॉक्टरसाहेब, तुम्हाला एवढं कसं समजत नाही? या माणसानं तीनचार तासापूर्वी एक खून केलाय. त्याला खून करताना पाहिल्याचा प्रत्यक्ष पुरावा आहे. पोलिसांना खबरही तावडतोब मिळाली होती. त्यामुळे खुनाच्या जागेवरच त्याला रेडहॅण्डेड् पकडला आहे! आता त्यात शंकेला काहीही जागा नाही...असं सगळं असताना तुमचं हे दमादमानं, प्रेमळपणे विचारणं काय चाललंय तेच मला समजत नाही!

खरे : तुम्ही थोडं धीरानं घ्याल का सावंतसाहेब?

सावंत : धीरानं घ्यायचं म्हणजे गुंतागुंत आणखी वाढवायची! मी सांगतो, तो नाटक करतोय. शेखर देशपांडेसारख्या हुशार आणि कर्तबगार माणसाला मोहननं भोसकून मारलंय...मला तरी त्याबद्दल शंका नाही!

मोहन : शेखर देशपांडेला मारलं? कुणी? आता कशी आहे त्याची तब्येत?

सावंत : (डॉक्टरना) पाहिलीत ही नाटकं? या माणसावर कसला विश्वास ठेवताय तुम्ही? अहो, इतका वेळ आपण त्याच्यासमोर शेखरच्या

खुनाची गोष्ट करतो आहोत...त्यातला एकही ज्ञानाचा कण त्याच्या मेंदूत गेला नसेल, यावर तुमचा विश्वास तरी कसा बसतो ?

खरे : म्हणूनच मला जरा शंका आहे...आणि माझ्या शंकेचं निरसन होत नाही, तोपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही !

सावंत : स्वस्थ बसणार नाही ना ? मग लावा दोन कानफटात आणि घ्या कबूल करवून !

मोहन : डॉक्टरसाहेब, मला प्लीज सांगा ना... शेखरला काय झालं ? कशी आहे त्याची तब्येत ?

खरे : आता पुष्कळच बरी आहे, मोहन !

मोहन : म्हणजे तो....वारला नाही...खरं ना ?

सावंत : छेः छे ! वारला नाही ... जिवंतपणीच नेलाय पोस्टमॉर्टेम करायला...

मोहन : पोस्टमॉर्टेम ? डॉक्टरसाहेब ?

खरे : एक मिनीट मोहन...मी जरा इन्स्पेक्टरसाहेबांशी बोलतो आणि मग तुला सविस्तर सगळं सांगतो...तोपर्यंत तू विश्रांती घे... रिलॅक्स ! ( सावंतांना ) सावंतसाहेब, जरा इकडे येता ?
( सावंत उठतात. खरे त्यांना घेऊन रंगमंचाच्या कोपऱ्यात येतात. लहान आवाजात त्यांना म्हणतात—) साहेब, या तरुणानं खून केलाही असेल कदाचित !

सावंत : केलाही असेल कदाचित ? अहो, केलाच आहे ! रामरावांनी प्रत्यक्ष पाहिलंय....सरळ सरळ एकवीस वार केले यानं शेखरच्या पोटात आणि छातीत !

खरे : मग काय, कुठलीही चौकशी न करता, खटलाबिटला न चालवता सरळ त्याला उचलून फाशी द्यायचा का ?

सावंत : नाही, तसं कुठं म्हटलं मी ? खटला, चौकश्या सगळं ते रीती-प्रमाणे व्हायलाच पाहिजे.

खरे : माझी तपासणी हा त्याचाच एक भाग आहे. हा एक सरळमार्गी गरीब तरुण आहे. कुणाच्या अध्यात ना मध्यात अशी याची

वृत्ती आहे..मग असं काय घडलं असावं की मोहनला शेखरचा खून करावासा वाटला ?

सावंत : ते मागाहून बघू हो खुनाचा मोटिव्ह वगैरे शोधता येईल नंतर. आता फक्त त्यानं स्वतःच्या तोंडानं सांगायचं की, 'मी शेखरचा खून केलाय' ...बस! एकदा त्याचं स्टेटमेन्ट, कबुलीजबाब घेतला की मी मोकळा....खुनाचं कारण, त्याचे इतर डिटेल्स वगैरे सगळं मी दोन दिवसांत तुमच्यासमोर हजर करतो पाहा !

खरे : इन्स्पेक्टर, तुमचा उत्साह वाखाणण्यासारखा आहे. पण या गडबडीत तुम्ही मला माझं काम करू देणार आहात का ?

सावंत : म्हणजे ?

खरे : तुम्ही उतावीळपणानं जर त्याला खडसावून सारखं विचारीत राहिलात, तर एखाद्या क्षणी तो कबूल होईलही...पण खटल्याच्या दृष्टीनं तुम्हाला किती उपयोग होईल ? अशा किती केसेसमध्ये असा उपयोग झालाय ?

सावंत : नाही, तेही बरोबर आहे म्हणा !

खरे : म्हणूनच म्हणतो, तुम्ही मला थोडा वेळ द्या... थोडा वेळ शांत बसलात तर तुम्हालाच काही तरी आश्चर्यकारक ऐकायला मिळेल...आणि नाहीच गप्प बसलात...सारखे त्याला प्रश्न विचारलेत तर..

सावंत : तर काय...तो कबुलीजबाब देईल ?

खरे : नाही. मी तुम्हाला बाहेर जायला सांगीन...

सावंत : डॉक्टर !

खरे : होय सावंतसाहेब, शेवटी मला माझं काम करता आलंच पाहिजे. त्यात अडथळा येऊन कसं चालेल ? इट्स पार्ट ऑफ माय ड्युटी !

सावंत : आय ॲम सॉरी डॉक्टरसाहेब पण मी बाहेर जावं अशी तुमची इच्छा आहे का ?

खरे : नाही. उलट, तुम्ही इथंच राहून जे काय घडतंय ते पहावं, ऐकावं अशी माझी इच्छा आहे. दॅट विल हेल्प यू अ लॉट !

...फक्त गप्प बसायचं....वाटल्यास काही गोष्टींच्या नोटस् घ्यायच्या.

सावंत : ठीक आहे डॉक्टर...मी गप्प बसेन....या कामाच्या टेन्शनमुळे मी जरा एक्साइट झालो होतो. पण....

खरे : लीव्ह इट सावंतसाहेब...आय कॅन अंडरस्टँड यू...!

सावंत : थँक यू !

खरे : मग जाऊ या आपण तिकडे ? तुम्ही सांगितल्याप्रमाणं वागणार ना ?

सावंत : प्रॉमिस !

खरे : ओ के... चला.

(दोघेही परत मोहनजवळ येतात. इन्स्पेक्टर सावंत जवळच्याच एका स्टुलावर गप्प बसून राहतात.)

हं... बोल मोहन, काय म्हणत होतास तू ?

मोहन : मी ? मी कुठे काय म्हणत होतो ! तुम्हीच... नाही, हे साहेब काहीतरी म्हणाले...शेखरविषयी काहीतरी... काय बरं ?

खरे : शेखरच्या खुनाविषयी काही तरी ?

मोहन : खुनाविषयी ? कुणाचा खून ? शेखरचा ?

[डॉक्टर उठतात. ट्रेमधून सीरिंज काढतात. औषध घेऊन एक इंजेक्शन तयार करतात आणि हे काम चालू असताना शांतपणे बोलत राहतात ]

खरे : होय मोहन. शेखर देशपांडेचा खून झालाय !

मोहन : (शॉक बसल्याप्रमाणे) नो नो डॉक्टर, तुम्ही हे काहीतरी सांगताय ! असं शक्यच नाही ! शेखरचा... आणि...

[चित्रविचित्र नजरेने दोघांच्याकडेही पाहतो. या नजरेत अविश्वासही आहे आणि कसलीशी शंकादेखील आहे. ]

खरे : यात काहीही शंका नाही मोहन...शेखरचा खून झाला आहे. त्याचे प्राण गेले आहेत...आणि त्याची बॉडी पोस्टमॉर्टेमसाठी, शवविच्छेदनासाठी गेली आहे !

मोहन : (शंका असल्याप्रमाणे) तुम्ही... तुम्ही हे खरं सांगताय डॉक्टर ? (सावंतना) इन्स्पेक्टर ना तुम्ही ? तुम्हीच मला इथं

आणलंत ना? खरं आहे हे? शेखर आता जिवंत नाही, हे खरं आहे...?

सावंत : ( डॉक्टरांच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहतात ) डॉक्टरसाहेब....!

खरे : बोला बोला! सांगा त्याला सावंतसाहेब की ही अगदी सूर्य-प्रकाशाइतकी स्पष्ट गोष्ट आहे...

ावंत : होय मोहन. शेखरची बॉडी पंचनामा करून मी स्वतः सरकारी दवाखान्यात पोचवली.

[ जिवलग मित्राच्या मृत्यूची बातमी प्रथमच ऐकल्याप्रमाणे त्याची मुद्रा झाकोळून येते आणि तो हुंदके द्यायला लागतो. डॉक्टर त्याच्या पाठीवर हात फिरवतात आणि त्याला मोकळे-पणाने रडू देतात....मग ते सावकाश त्याच्या शिरेत इंजेक्शन देतात. ]

मोहन : ( हुंदके देत ) हे काय आहे, डॉक्टरसाहेब? मला इंजेक्शनं कसली देताय... मघाशीही एक दिलंत... शेखरसारखा एक जिवलग मित्र गेल्यावर मला एवढं दुःख होणारच.... पण बाकी काहीही...( एकदम ) ओह! शेखर!! ( रडतो )

खरे : मोहन, प्लीज. शांत हो...ही इंजेक्शन्स तुला शांत होण्यासाठीच दिलीत...बघ, दोन मिनिटांत तुला बरं वाटायला लागेल.

[ मोहन डोळे पुसतो...नाक पुसतो आणि मग डॉक्टरांच्याकडे पहात केविलवाण्या नजरेने म्हणतो—]

मोहन : डॉक्टर, डॉक्टर, मला घरी सोडाल? मी घरी जातो...आईला भेटायचंय मला...झोपदेखील येतीय मला...मला....काहीच समजत नाही डॉक्टर...मला घरी जाऊ द्या...

[ तो उठतो...तो उठल्याबरोबर सावंतही सावधगिरीनं उठतात. डॉ. खरे त्यांना खुणेनं बसायला सांगतात. मग खरे मोहनच्या खांद्यावर हात ठेवतात आणि अतिशय प्रेमाने म्हणतात—]

खरे : मी तुला घरी जाऊ देणार आहे मोहन, पण थोड्या वेळानं–

मोहन : पण का ? मला शेखरच्या घरी सुद्धा गेलं पाहिजे. त्याचे आई-बाबा किती दुःखात असतील ! मला त्यांचं सांत्वन नको का करायला ?

खरे : ( त्याला खुर्चीवर बसवीत ) तुझं अगदी बरोबर आहे मोहन. पण तुझाही इतका जवळचा मित्र गेलाय, आम्हाला तुझं सांत्वन करू दे...तू प्रथम शांत हो आणि मग कुठे जायचे ते जा... तसं कशाला ?.... मीच तुला माझ्या गाडीतून सोडून देईन ! ओ के ?

मोहन : थँक यू डॉक्टरसाहेब ! पण मला असं, झोप येईल असं का वाटतंय सारखं...?

खरे : काही नाही ..तुला जरा टेन्शन आलंय ना, म्हणून तसं होतं... तू आरामात बैस...रिलॅक्स !

[ मोहन आरामात रेलतो. काही वेळ तसाच स्तब्धतेत जातो. डॉक्टर फेऱ्या मारतात...रडता रडता झोपलेलं मूल जसं झोपेत हुंदके देतं तसं मोहन करतो. मग डॉक्टर खरे परत त्याच्या-जवळ येतात. त्याची नाडी पाहतात. ]

मोहन, हाऊ आर यू नाऊ ?

मोहन : क्वाइट ओ के, डॉक्टरसाहेब.

खरे : जरा बोलू शकशील माझ्याशी ?

मोहन : होय.

खरे : मोहन, तू...तू शेखरला का मारलंस ?

मोहन : ( विचित्र नजरेनं त्यांच्याकडे पाहत ) मी ? मी नाही शेखरला मारलं !

खरे : मग कुणी मारलं असेल ?

मोहन : असेल त्याच्या वाईटावर कुणीतरी !...पण...पण हे चांगलं झालं नाही. शेखर फार चांगला मुलगा होता साहेब ! पोलिसांनी त्या माणसाला शोधून काढून त्याला चांगली कडक शिक्षा द्यायला पाहिजे. शेखरसारख्या माणसाचा, माझ्या मित्राचा खून करतो म्हणजे काय ?

खरे : डोंट वरी मोहन ! पोलीस ते काम करतीलच. फक्त तू शेखरचा खून केला नाहीस हे नक्की ना ?

मोहन : अगदी शंभर टक्के ! मी त्याला कसा मारीन डॉक्टरसाहेब ? तो माझा अगदी लहानपणापासूनचा जिवलग मित्र...आम्ही एकत्र वाढलो....खेळलो...अभ्यास केला... उनाडक्या देखील केल्या...मग मला सांगा, माझा हात तरी उठेल का शेखरला मारायला ?

खरे : अगदी बरोबर आहे तुझं ! दुसराच कुणीतरी त्याच्या वाईटावर असणार !

मोहन : पण त्याच्या वाईटावर कोण असणार ? तो अजातशत्रू होता. सगळ्यांशीच त्याचे संबंध चांगले होते.

खरे : पण मोहन....पोलीस म्हणतात की तूच शेखरला मारलंयस. तसं करताना प्रत्यक्ष पाहणारा पुरावा मिळालाय त्यांना !

[ क्षणभर मोहन गोंधळतो...त्याला काय तो विचार स्पष्ट होत नसावा...पण क्षणकालानं तो हसायला लागतो. ]

काय झालं रे मोहन ?

मोहन : ती एक मोठी मजा आहे डॉक्टरसाहेब !....तो एक भास आहे...दिवास्वप्न आहे !

खरे : ( खोटं हसत ) असं ? ही काय गम्मत आहे बुवा ?

मोहन : गंमतच आहे न् काय ! प्रथम मला वाटायचं की मलाच फक्त असे भास होतात...पण आता माझ्या लक्षात आलं की मला एकट्यालाच तसं वाटत नाही, तर पोलिसांना देखील तसंच भासतं...तसंच घडलंय असं वाटतं ! ( हसतो ) डोन्ट वरी इन्स्पेक्टर, प्रत्यक्षात तसं काही घडलेलं नसतं....तुम्ही आत्ता शेखरच्या वरी जा....तो काहीतरी काम करीत असेल किंवा जेवायला बसला असेल....तुम्ही त्याच्या घरात गेल्याबरोबर तो तुम्हाला म्हणेल..." हॅलो मोहन, कसा आहेस ? जेवायला येतोस ? "

सावंत : असं तो मला म्हणेल ?

मोहन : अगदी नक्की....तुम्ही मात्र तिथे असे गेलेले असणार की त्याचा खून झालाय आणि तो मी केलाय ! फरगेट इट साहेब, या अशा भासचित्रांना फारशी किंमत द्यायची नसते.

खरे : मोहन, हा असा भास तुला कधीपासून होतो ?

मोहन : तुम्हाला आणि या साहेबाना कधीपासून होतो ?

खरे : आम्हाला ? ( क्षणभराने ) आता एवढ्यातच... म्हणजे शेखर देशपांडेचा खून झाला तेव्हापासूनच !

मोहन : हां...हां ..म्हणजे नवीन आहे...मला फार पूर्वीपासून होतो. कॉलेजमध्ये गेल्यानंतर सुरू झाला.. पण त्याची एवढी काळजी करू नका डॉक्टरसाहेब.. तसं भीषण काही घडत नाही. फक्त ते आपल्या हातून घडतंय असं आपल्याला वाटत राहतं !

खरे : असं होय ! हे मला माहीत नव्हतं ! ! ( क्षणकाल जातो ) मोहन, तुझी आणि शेखरची मैत्री कधीपासूनची रे ?

मोहन : फार लहानपणापासून...आम्ही अगदी लंगोटीयार म्हटलं तरी चालेल...अगदी जिवलग मित्र.

खरे : तुझ्या घरी त्या वेळी कोणकोण होतं ?

मोहन : कुणी नाही...फक्त आई. माझ्या लहानपणापासून फक्त आई आणि मीच राहतोय.

खरे : कुठे रहात असत ?

मोहन : शेवड्यांच्या चाळीत...आमची एक रूम होती.

खरे : आणि शेखरच्या वडिलांचा हा आहे हा राजवाड्यासारखा बंगला पहिल्यापासूनच आहे का ? की एवढ्या एवढ्यात बांधला ?

मोहन : छे : छे : ! फार पूर्वीपासूनचा आहे तो... माझ्या आठवणीत शेखर त्याच बंगल्यात राहत आहे.

खरे : त्याच्या घरी माणसंही खूप, नाही का ?

मोहन : अगदी ! भरलेलं असायचं घर... माझी आई तर म्हणायची नांदतं गोकुळ आहे !

खरे : म्हणजे शेखरची मजाच होती म्हण की....भलं मोठं घर....खूप

खूप माणसं जिव्हाळ्याची....आणि संपता संपणार नाही अशी श्रीमंती !

मोहन : नाहीतर काय ! परमेश्वरानं त्याला काही म्हणजे काही कमी ठेवलेलं नव्हतं...

खरे : पण अशा वेळी तुला स्वतःबद्दल फार वाईट वाटत असेल... नाही ?

मोहन : खूपच वाईट वाटायचं...म्हणजे त्याचं चांगलं आहे म्हणून नव्हे, तर परमेश्वरानं हा भेदभाव केला म्हणून... विशेषतः आमच्या घरात काही ओढाताण झाली की मला फार वाटायचं. वाटायचं, माझा एक जवळचा मित्र.. आम्ही एका वयाचे, एकत्र वाढणारे आणि माझ्याच नशिबी ही सदाचीच भ्रांत का ? शेखरनं असं कोणतं पुण्य केलंय की देवानं त्याला भरभरून सुखं दिलीत ?

खरे : अशा वेळी त्याचं काहीतरी वाईट व्हावं असं वाटत असेल नाही तुला ?

मोहन : वा ! डॉक्टरसाहेब, असं कसं वाटेल ? आपला जानी दोस्त आहे तो. उलट, त्याच्यावर काही संकट आलं तर जीवाची पर्वा न करता मदतीसाठी धावत जाणारा मी पहिला असेन !

खरे : येस येस ! त्याबद्दल माझी खात्रीच आहे... तुझं तसं प्रेमच आहे त्याच्यावर.

मोहन : फक्त माझंच नाही, त्याचाही तेवढाच जीव आहे माझ्यावर.

खरे : असणारच ! एवढा फरक तुमच्या दोघांत असूनही त्यानं तुझ्याशी दोस्ती करावी, हा त्याच्या मनाचा मोठेपणाच झाला नाही का ?

मोहन : त्यात कसला आलाय मोठेपणा ! मित्रामित्रांत गरीब–श्रीमंत वगैरेसारखा भेदभाव हवाच कशाला ? त्याच्या डोक्यात तसा विचारदेखील कधी आला नाही !

खरे : शेखर देशपांडे एस. एस. सी. ला बोर्डात दहावा वगैरे आला होता नाही ? तुला खूप आश्चर्य वाटलं असेल नाही ?

मोहन : छे: छे: ! मला खात्रीच होती, तो मेरिटमध्ये येणार याची. तो अगदी पहिल्यापासूनच हुषार होता. वर्गातही पहिला–दुसरा नंबर त्यानं कधी सोडला नाही.

खरे : आणि तू बोर्डात कितवा आलास ?

मोहन : मी ? आणि बोर्डात ? मला पंचेचाळीस टक्के मार्क होते. मी आमच्या वर्गातदेखील दहात नव्हतो !

खरे : अच्छा ! म्हणजे शिक्षणाच्या बाबतीत देखील तुमच्यात हा फरक होताच म्हण की !

मोहन : त्याला काय करणार ! त्याच्याच पुस्तकांवर माझा अभ्यास व्हायचा....घरी दारिद्र्यानं काही ना काहीतरी कटकटच चालायची. डोकं ठिकाणावरच रहायचं नाही.

खरे : खरं म्हणजे त्याच वेळी मॅट्रिकनंतर नोकरी पत्करायचीस तू !

मोहन : तेच करणार होतो. पण शेखरनं ऐकलं नाही... माझ्या आईची समजूतही त्यानंच घातली. केवळ पैशाची अडचण आहे म्हटल्यावर माझी फी भरण्याचीही त्यानं तयारी दाखवली !

खरे : हं....हं....म्हणून तू कॉलेजात गेलास ?

मोहन : हो ! त्याच्यामुळेच तर माझं कॉलेजशिक्षण झालं.

खरे : बरोबर आहे. पण त्याच वेळी तुझ्या मनात असं आलं असेल की शेखर आपल्यासाठी एवढं करतो, आपल्याला मात्र त्याच्यासाठी काहीही करता येत नाही !

मोहन : अगदी बरोबर ! या विचारानं मी रात्रीची झोप गमावली ! शेखरसाठी मी काय करू शकणार होतो ? जगातली सगळी सुखं त्याच्यासमोर हात जोडून उभी होती. मग मात्र आमच्या दोघांच्यातलं हे अंतर मला फार जाणवायला लागलं...त्याचं आयुष्य हे परमेश्वराचं स्पेशल फेवर आहे असं मला वाटायला लागलं. एखाद्या तरी बाबतीत शेखरला ओव्हरटेक करून आपण पुढं गेलं पाहिजे, याचा ध्यास लागला... म्हणजे मित्रत्वाच्या नात्यानं हां–आमच्या मैत्रीत कधीच अंतर पडलं नाही....एकमेकांसाठी आमचा अगदी जीव तुटायचा...त्या कशाकशात फरक पडल

नाही. पण माझ्या मनात मात्र हे असं यायचं....

खरे : आणि मला वाटतं, त्याच वेळी तुला तुझी ही भासचित्रं, की कल्पना, काय ते दिसायला लागलं असेल!

मोहन : हो, म्हणजे . साधारण त्याच वेळी... म्हणजे त्याचं काय झालं (अडखळतो)

खरे : काय झालं?

मोहन : सांगायला जरा संकोच वाटतो.

खरे : अजिबात संकोचू नकोस.... मी तुझ्या थोरल्या भावासारखा आहे.

मोहन : मला सुषमा आवडायची फार आवडायची!

खरे : ही सुषमा कोण?

मोहन : तुम्हाला सुषमा माहिती नाही? सुषमा मुजूमदार....ती आमच्याच वर्गात होती.. तिला पाहिलं तेव्हापासून ती माझ्या मनात जाम घुसली. तसा तिचा बाप वगैरे काही फार श्रीमंत नव्हता.... म्हणजे माझ्यासारख्या गरिबाच्या आयुष्यात ती फिट बसली असती... म्हणजे मी काही उंटाच्या...यू नो व्हाट!

खरे : येस, आय नो! सुषमाबद्दल असं काहीतरी वाटणं यात तुझं काहीच चुकलं नाही...ते वयच तसं असतं.

मोहन : खरंच डॉक्टर, ते वयच तसं असतं अहो, मी रात्र रात्र जागून सुषमावर कविता वगैरे लिहायचो! हाऊ फनी!!

खरे : मग त्या तिला त्या दाखविल्यास की नाही?

मोहन : तशी कधी वेळच आली नाही...आमचं आपलं फिफ्टी परसेंट! ओळखच नव्हती ... आणि ती ओळख झाली ती अशा परिस्थितीत की

खरे : काय झालं होतं?

मोहन : म्हणजे त्या वेळी...

(पार्श्वसंगीत सुरू होतं....अंधार होतो. उजेड येतो तेव्हा

कॉलेजच्या कँटीनचं दृश्य. चारपाच मुलं आहेत. संध्याकाळ असल्यामुळे फारशी गर्दी वगैरे नाही.
एका कोपऱ्यात मालक गल्ल्यावर बसलेला. तो कुणाच्या तरी नावानं ओरडतो.)

मालक : जोशी, तुझे गेल्या महिन्यातले साठ रुपये राहिलेत रे! या उधारीच्या धंद्यात तुम्ही माझी वाट लावणार!

जोशी : आम्ही काय कुठे पळून चाललोत का रे भटा? बापाची मनी-ऑर्डर आली की तोंडावर फेकीन साठ रुपडे!...चहा पाठव.

मालक : अरे, त्या जोशीसाहेबांना चहा दे रे ... जावई आहेत आमचे ते!

(याच वेळी मोहन प्रवेश करतो, एका मोकळ्या टेबलावर बसून राहतो एक वही उघडतो.)

जोशी : काय मोहन्या, शेखऱ्या नाही का आला अजून?

मोहन : नाही रे...त्याचीच वाट पाहतोय मी!

जोशी : काय बिडी मारायची का?

मोहन : नो...थँक्स!

(शेखर आणि सुषमा प्रवेश करतात. शेखरच्या बरोबर सुषमाला पाहून मोहन दचकतो...उठून उभा राहतो. )

शेखर : हॅल्लो मोहन...फार वेळ झाला नाही ना तुला येऊन?

(त्याच टेबलाशी बसतात.)

मोहन : नाही...आत्ताच आलो होतो.

शेखर : बाय द वे...तुझी ओळख करून देतो...ही...

मोहन : सुषमा मुजूमदार....ओळखतो मी त्यांना!

शेखर : अरे! तू कसा काय ओळखतोस?

मोहन : आम्ही दोघेही एकाच वर्गात आहोत.

शेखर : बघ, सायन्सला असल्यावर हा घोटाळा होतो ...चांगल्या चांगल्या पोरी एकतर वर्गातच नसतात आणि असल्या तरी आपल्याला त्यांच्याकडे लक्ष द्यायला वेळ नसतो!

मोहन : तरीही वेळात वेळ काढून तू हे करतोयस...तुझं कौतुकच करायला पाहिजे....

शेखर : ए...मोहन हे...हे इतक्यात आईबाबांना सांगायचं नाही हं! वेळ आली की सांगून टाकू.

मोहन : मी नाही सांगणार...पण सुषमा, तुमच्या घरची परवानगी?

सुषमा : शेखरच्या स्थळाबाबतीत आमच्या घरातून कधी नकार येणार आहे?

मोहन : (विचारमग्न) हं...हे असंच असतं..!

शेखर : काय रे?...कसला विचार करतोयस?

मोहन : (भानावर येत) नाही...नाही, विचार कसला! एनी वे, कॉंग्रेच्युलेशन्स....बोथ ऑफ यू...

दोघे : थँक्स...थँक यू...

मोहन : तुमचा जोडा अगदी, काय म्हणतात त्याला... लक्ष्मीनारायणासारखा शोभेल!

शेखर : जास्त शहाणपणा करू नकोस! वडीलकीच्या नात्यानं बोलायची गरज नाही...माझ्यापेक्षा दीड वर्षानं लहान आहेस, घोड्या!

सुषमा : असं काय बोलतोस शेखर?

शेखर : म्हणजे 'घोड्या'विषयी म्हणतेस तू? अग, तुला अजून काय काय ऐकायचंय! (उठतो) बरं मोहन, मला त्या दाते मास्तरांनी बोलावलंय. मी दहा मिनिटांत जाऊन येतो.

सुषमा : दातेसरांनी बोलावलंय.. म्हणजे पाऊण तासाचा पीळ!

शेखर : नाही ग...आत्ता कटवून येतोच. तोपर्यंत तुम्ही जरा कॉफी घ्या मग बरोबर घरी जाऊ.
(तो घड्याळ बघतो...निघतो.)

सुषमा : लवकर ये हं!

शेखर : आलोच!
(शेखर जातो. मोहन सुषमाकडे पहात बसतो. त्याला काय बोलावे ते सुचत नाही...त्याच्या डोक्यात विचारांची गर्दी होते.)

सुषमा : बोला ना काहीतरी—

मोहन : म्हणजे...मला.. मुलींशी बोलण्याची सवय नाही ना! तसा आईशिवाय स्त्रियांशी मी फारसा बोललोच नाही.

सुषमा : (हसते) अगबाई! मग लग्न झाल्यावर काय करणार!

मोहन : आता तर लग्नच करू नये असा विचार येतोय.

सुषमा : का बाई?

मोहन : का?

(पटकन तिच्याकडे पाहतो...एक विचित्र पार्श्वसंगीत सुरू होते. रंगमंचावर नेहमीचा प्रकाश नाहीसा होऊन जांभळा...लालसर रंगाचा प्रकाश दिसू लागतो...त्यात सगळ्यांचेच चेहरे विकृत दिसतात....मोहन आणखी विकृत दिसतो....तो उठतो...कॅन्टीन-मधल्या इतरांच्याकडे पाहतो...त्याच्याशी नजरानजर होताच एकेकजण कॅन्टीन सोडून जायला लागतो. शेवटी गल्ल्यावरचा मालक पण जातो. आता संपूर्ण कॅन्टीनमध्ये सुषमा आणि मोहन दोघेच राहतात...मोहन सुषमाकडे वळतो...)

मोहन : मी का लग्न करणार नाही, असं विचारीत होतीस नाही का? मग ऐक. मला तुझ्याशी लग्न करायचं होतं. अजिबात न बोलता मी तुझ्यावर प्रेम केलं....रात्रंदिवस तुझ्याच ध्यासात राहिलो. वेड्यासारख्या तुझ्यावर कविता पण केल्या!

सुषमा : काय सांगताय तुम्ही मोहन? आणि तुम्ही असे काय बघताय माझ्याकडे? तुमच्या डोळ्यांत सगळा खून उतरून आलाय... (उठते. दरवाज्याकडे जाऊ लागते.) कॅन्टीनमधले लोक तरी असे अचानक कुठे गेले कुणास ठाऊक!

(मोहन वेगाने जाऊन तिला अडवतो.)

मोहन : नाही. आता तू जायचं नाहीस. या कॅन्टीनमध्ये फक्त तू आणि मी आहोत. शेखर दातेसरांच्या चरकात अडकलाय...म्हणजे आणखी अर्धापाऊण तास तरी तो येत नाही...तेवढ्यात आपल्याला आपला कार्यभाग उरकता येईल.

सुषमा : म्हणजे, तुम्ही म्हणताय तरी काय? तुमच्या डोक्यात काहीतरी

वेडेवाकडं आलंय मोहन.

मोहन : हो आलंय आणि मी ते खरं करणार आहे.

सुषमा : नो...यू कॅनॉट डू दॅट !

मोहन : मग ! माझा घास त्याच्या तोंडी का पडावा ? इतके दिवस, अगदी ल्हानपणापासून मी पाहतोय...प्रत्येक गोष्ट त्याच्या झोळीत, न मागता पडतेय...त्या वेळी मला फक्त वाईट वाटायचं...वाटायचं की यात अन्याय आहे....पण हरकत नाही, त्याचा वाटा त्याला मिळतोय !....पण आता हा माझा वाटासुद्धा त्याच्या ताटात जायला लागलाय. मला हे सहन होणार नाही... मी तो वापरून टाकीन...

सुषमा : नो ऽऽऽ !

मोहन : (तिच्याजवळ येतो. तिचा हात पिरगाळतो.) मी थांबणार नाही...तुला माहितीय...मी तुला सोडणार नाही.

(पार्श्वसंगीत वाढत जाते, आणि त्याच वेळी अंधार होतो... अंधारात एक किंकाळी फुटते...क्षणभर स्तब्धता. उजेड येतो, तेव्हा परत पहिल्यासारखे दृश्य दिसते...
मोहन खुर्चीत बसलेला. डोकं गच्च धरून...डॉक्टर नोट्स् घेतायत. इन्स्पेक्टर अस्वस्थपणे उभे.)

खरे : अच्छा ! मग तू तिच्यावर बलात्कार केलास ?

मोहन : हो.

खरे : आणि मग त्यानंतर ?

मोहन : सुषमानं आत्महत्या केली !

खरे : मग शेखरचं काय झालं ?

मोहन : खरंच...(विचारात पडतो.) शेखरचं काय झालं बरं ! (क्षणभरानं एकदम म्हणतो) बरोबर ! त्याला कळलंच नाही सुषमानं

का आत्महत्या केली ते !

खरे : साहजिक आहे...त्याला हे कोण सांगणार ?

मोहन : हो ना ! कोण सांगणार ?

खरे : पण हा सगळा प्रकार घडून गेल्यावर तुला काय वाटलं !

मोहन : मला खूप आनंद झाला. माझ्या मनातल्या विरुद्ध बाजूच्या एका गोष्टीचा खातमा झाला. आय वॉज व्हेरी हॅपी...आणि मला वाटायला लागलं की आपल्या दुःखावर हा एक मार्ग आहे.

सावंत : पण डॉक्टरसाहेब, मला हे समजत नाही की....

खरे : थांबा...! थोडा वेळ थांबा....सगळी केस माझ्या लक्षात येत चाललीय....तुम्हालाही कळेल....थोडी कळ काढा.

सावंत : ठीक आहे. आपण गप्प !

खरे : मोहन, यानंतर असे प्रसंग वारंवार घडले असतील नाही का ? प्रत्येक वेळी तू मनाचं समाधान करीत गेला असशील...

मोहन : होय...अगदी वारंवार ! प्रत्येक वेळी मीच जिंकत होतो, आणि जास्तीत जास्त समाधानी होत होतो. (एकदम स्तब्ध होतो... आणि डॉक्टरांच्याकडे रोखून पहात म्हणतो) डॉक्टरसाहेब, मी तुम्हाला हे सांगितलं का...की हे सगळे भास असतात... असं काहीही घडत नाही !

खरे : असं ? हे नाही सांगितलंस तू मला !

मोहन : म्हणजे मुख्य गोष्टच राहिली सांगायची ! अहो, हे सगळं झालंय असं आपलं मला वाटायचं. प्रत्यक्षात तसं काही...

खरे : थांब....थांब . नीट विचार कर बघू...हा बलात्कार....नंतरची सुषमाची आत्महत्या वगैरे काहीही घडलं नाही ? नीट विचार कर हं...कदाचित घडलंही असेल !

मोहन : (विचारात पडतो) अं ? घडलंही असेल ! खरंच, तसं घडलं असण्याची शक्यता....

खरे : जाऊ दे...लीव्ह इट् ! मग या प्रकारानंतर शेखरची आणि तुझी अशी संघर्षमय गाठ कधी झाली ?

मोहन : तसा आमच्यात संघर्ष होण्याचं काहीच कारण नव्हतं. कारण आम्ही एकमेकांचे दोस्त होतो. जानी दोस्त. त्याच्याशिवाय मला आणि माझ्याशिवाय त्याला कधी करमायचंच नाही!

खरे : तरी स्वतःच्या नशिबाचं वाईट वाटण्यासारखा प्रसंग घडलाच असेल.

मोहन : तसा एकदा संतापानं फुलून होतो मी...कॉलेजच्या वार्षिकाची काव्यस्पर्धा होती. मी कविता पाठविली होती. शेखरनंही एक कविता स्वतःची म्हणून दाखवली मला. दॅट वॉज ट्रॅश...वाचता क्षणीच जाळून टाक म्हणून सांगितलं मी त्याला....पण यू विल बी सरप्राइज्ड, त्याच्या कवितेला पहिलं बक्षीस मिळालं होतं! आता हे बक्षीस काय काव्यगुणांना होतं?....तेव्हा माझं टाळकं सरकलं. मी कवी होतो, मनापासून कविता करीत होतो. त्यांचा अभ्यास करीत होतो आणि कुठून कुठून जमवलेल्या शब्दांच्या ओळी एकापुढे एक मांडून काव्याचं बक्षीस शेखरला!...याचा अर्थ पैशाकडे पैसा जातो आणि चांगल्या नशिबाकडे आणखी चांगलं नशीब....गुणांना किंमत शून्य!

खरे : ( सुस्कारून ) हं! व्हेरी बॅड!! बरं...आणखी काही?

मोहन : ( क्षणभर विचार करून )....म्हणजे त्याचं काय व्हायचं साहेब, तो हुषारीनं नंबरात पास होत इंजिनियर बनला आणि त्याच्या आधी दोन वर्षे मी पदवीधर होऊन बसलो. पण पदवीशिवाय काहीच पदरात पडत नव्हतं...सारखा अर्ज करीत होतो, पण कुठंही काही जमत नव्हतं. वशिला नव्हता आणि मार्क्सदेखील भरपूर नव्हते. शेखरच्या वडिलांचा वशिला लावायला मन तयार होत नव्हतं...जवळ जवळ अडीच–तीन वर्षे मी रोज अर्ज करीत होतो... पण नोकरी नव्हती. परिस्थिती दिवसेंदिवस जास्तच बिकट होत चालली होती.

[ परत अंधार होतो. पार्श्वसंगीत चालू. उजेड होतो. आता

दिसते ती मोहनची खोली. एक मोडकी वाटणारी खुर्ची इथे आवश्यक.
बाहेरून ' मोहन मोहन ' अशा हाका मारीत शेखर येतो.]

शेखर : (आत पहात) आईऽऽ अहो मोहनची आईऽऽ! कमाल झाली, कुठं गेली ही मंडळी ऐनवेळी!
(काहीतरी पुटपुटत तिथेच बसतो. तेवढयात बाहेरून मोहन येतो...त्याच्या हातात एक पुडा.)

मोहन : अरे शेखर, तू कधी आलास ?

शेखर : आत्ताच...पण तुम्ही कुठे नाहीसे झाला होतात!

मोहन : शेजारीच गेलो होतो. वकिलीणबाईंच्या घरी. त्यांचं तिखट दळून दिलं आईनं. त्यातलं थोडंसं घेऊन जा असा निरोप आला होता...ते घेऊन आलो. ते मरू दे....तू कसा काय वाट चुकलास ?

शेखर : अरे आनंदाची बातमी...मला नोकरी मिळाली...फक्त मेडिकल एक्झॅमिनेशन राहिली होती, ती आता देऊन आलो. आय ॲम फिट फॉर द जॉब!

मोहन : (खऱ्या आनंदानं) काँग्रॅच्युलेशन्स शेखर!

शेखर : थांब... थांब... अजून डोळे तपासायला जायचंय... त्याच डॉक्टरकडे निघालोय...पंधरावीस मिनिटांत डोळ्यांच्या डॉक्टरचं ' ओ के ' फॉर्मवर पडलं की मग नोकरीची अपॉइंटमेन्टच मिळेल दुपारच्या आत अर्थात या सगळ्या फॉर्म्यालिटीज आहेत म्हणा! नोकरी पक्कीच आहे.
(याकडे मोहनचे लक्ष नाही. त्याच्या डोक्यात काहीतरी वेगळंच विचारचक्र.) मोहन, आय ॲम रिअली व्हेरी व्हेरी हॅपी.
[मोहन वळून त्याच्याकडे पाहतो.

रंगमंचावरचा नेहमीचा प्रकाश नाहीसा होतो. जांभळा लालसर रंगाचा प्रकाश पसरतो. पार्श्वसंगीताची लय वाढत जाते...

मोहन विकृत नजरेने शेखरकडे पाहतो. मग त्याची नजर स्वतःच्या हातातल्या तिखटाच्या पुड्याकडे जाते...तो पटकन पुडा फोडतो आणि दोन्ही हातांत तिखट घेतो....शेखर बावरलेला...मोहन त्याच्या मागे जातो...आणि काय घडतंय हे कळायच्या आत त्याच्या डोळ्यांत तिखट भरतो...शेखर मोठमोठ्यानं किंचाळतो अंधार होतो...पार्श्वसंगीत चालूच... क्षणभरानं उजेड येतो.

डॉक्टरांच्या समोरच्या खुर्चीत बसून मोहन मोठमोठ्याने हसत असतो. ]

मोहन : ही लॉस्ट दॅट जॉब ! ( हसतो )

खरे : खरंच ?

मोहन : मग ?...त्याच्या डोळ्यांची मी पार मैय्या करून टाकली... साला आठ दिवस तरी काही वाचू शकला नसेल.

खरे : अच्छा ! बरं, त्याचं नुकसान झालं असे किती प्रसंग घडले नंतर ?

मोहन : काही आठवत नाही.

खरे : काही आठवत नाही की तुला सांगायचं नाही ?

मोहन : खरं सांगू का डॉक्टरसाहेब...मी फार बोअर झालोय...मला झोप येतेय. तुम्ही दोघेही जाम बोअरडम आहात !

सावंत : ( दरडावून ) मोहन ?

खरे : ( सावंतना ) नो ऽऽ ! पेशन्स सोडायचा नाही ! ( मोहनला ) झोपी जाण्याच्या आधी एखादा प्रसंग सांग ना....निदान आजचा तरी !

मोहन : आज ? आज काय झालं ?

खरे : अरे, तुला भास झाला ना, आपण शेखरचा खून केल्याचा ?

मोहन : ( स्वतःच्याच विचारात ) मला...भास ? भास होता तो ? येस येस, इट मस्ट बी लाइक दॅट !

खरे : डेफिनेटली ! पण काय होतं ते ?

मोहन : आता सगळं सविस्तर आठवत नाही, पण....

(अंधार होतो...
उजेड येतो तो शेखरच्या घरावर. डायनिंग टेबलाजवळ शेखर बसला आहे...टेबलावर सफरचंद किंवा तत्सम फळांची प्लेट ठेवलेली. तिथंच एक धारदार सुरी....शेखर जरासा विचारमग्न. तेवढ्यात बाहेरून मोहन येतो.)

मोहन : शेखर....

शेखर : हॅल्लो मोहन!...बैस मी मुद्दामच तुला निरोप केला.

मोहन : का रे?

शेखर : काल रात्रीच मी माझं आणि सुषमाचं प्रकरण आईबाबांच्या कानावर घातलं....

मोहन : मग? त्यांनी नकार दिला?

शेखर : वेडाच आहेस. सुषमासारख्या मुलीला आईबाबा नकार कशाला देतील? त्यांनी तिला पाहिली आहे...आणि आईला तर ती फारच आवडलीय...चिक्कार खूष झालीय आई!...खरंच मोहन, मी खूप खूप आनंदात आहे!
(मोहनच्या डोळ्यांत एक विकृत झाक तरळते.)

मोहन : सुषमाबद्दल बोलतोयस तू?

शेखर : म्हणजे?...दुसरं कुणाबद्दल बोलणार? असं का विचारतोयस तू?

मोहन : (मुठी आवळीत, विचित्र आवाजात म्हणतो) शेखर, शेखर आय हॅव रेप्ड हर...मी सुषमावर बलात्कार केलाय!

शेखर : मोहन!

मोहन : आणि तिनं आत्महत्या केलीय.

शेखर : व्हॉट नॉन्सेन्स! हे कधी घडलं?

मोहन : वर्ष होऊन गेलं!

शेखर : (आता त्याला वेगळी शंका येते) मोहन, तुझी तब्येत बरी आहे ना? बैस, बैस इथं (त्याला टेबलाजवळ बसवतो) अरे,

सुषमा आता अर्ध्या तासापूर्वी भेटली मला...

मोहन : इम्पॉसिबल! (मोठमोठ्याने हसत) ते तिचं भूत असेल!

शेखर : तुला वेडबीड लागलं का ?....अरे....

[याच वेळी मोहन टेबलावरची धारदार सुरी घेऊन उठतो आहे. त्याच्या डोळ्यांत चढलेलं रक्त आणि हातातली सुरी पाहताच शेखर चरकतो... "मोहन!" असे म्हणून त्याच्या हातातली सुरी घेण्यासाठी त्याला भिडतो. थोडी झटापट होते. आणि त्याच वेळी मोहन शेखरच्या पोटात अनेक वेळा सुरी खुपसतो. याच वेळी एक गृहस्थ "देशपांडेसाहेब" अशी हाक मारीत आत येतो. शेखर कोसळत असलेला आणि मोहनच्या हातातली रक्ताची सुरी पाहून तो क्षणभर अवाक् होतो आणि दुसऱ्याच क्षणी "पोलीस...पोलीस" असे ओरडत बाहेर पडतो. या प्रसंगाच्या पार्श्वभूमीवर चढत जाणारे पार्श्वसंगीत आहेच. त्या गृहस्थाच्या जाण्यानंतर त्या पार्श्वसंगीतालाच भीषण वाटणारा सायरनचा आवाज जोडला जातो. अंधार.

उजेड येतो तेव्हा डॉक्टरसमोर बसलेल्या मोहनचे डोळे मिटत आलेत....]

मोहन : आणि मला वाटलं की मी शेखरला मारलं...पण ते तसं नसणार . हा नेहमीप्रमाणं मला होणारा भास असणार...खरंच, शेखर आता घरी त्याच्या लग्नाचं प्लॅनिंग करीत असेल... खरं...च आय....ॲम....फीलिंग व्हेरी स्लीपी....व्हे....री...स्...
(झोपतो. सावंत उठतात. विचारमग्न.)

सावंत : मला हे समजत नाही डॉक्टरसाहेब की....

खरे : थांबा...शेखरचा खुनी मोहनच आहे....फक्त त्यानं कधी बलात्कार केला नाही शेखरच्या डोळ्यांत तिखटही भरलं नाही. त्याच्या शेखरविषयीच्या असूयेने त्या भासचित्रांचं रूप घेतलं होतं. पुढे पुढे ही असूया इतकी वाढली की त्याची मनोकामना पुरविणाऱ्या भासचित्रानंच प्रत्यक्ष रूप घेतलं आणि

त्याला नको असतानाही त्याच्या हातून शेखरचा खून झाला...! अनेक वेळा भोसकल्यानं या खुनाला जे अमानुष स्वरूप मिळालंय त्याचं कारण कदाचित असं असेल की हे भासचित्रच आहे अशी जाणीव त्याच्या अंतर्मनाला होत असेल. कारण त्या अंतर्मनाचा या पूर्वीचा अनुभव तसा होता. म्हणून त्या भास-चित्रात शेखरवरचा राग कसाही काढून घ्या....प्रत्यक्षात मात्र तो आपला मित्र आहे; असं मोहनला वाटत असावं....पण दोन मनांची ही रेषा एकेरी झाली तेव्हा ते कृत्य प्रत्यक्षात घडलं होतं. कधी कधी स्वप्नात असतानाही हे स्वप्नच आहे अशी पुसटशी जाणीव अर्धनिद्रित माणसाला असते...असा हा प्रकार आहे...एनी वे...आता मात्र तुम्हालाही या केसकडे वेगळ्या दृष्टीनं पहावं लागणार!

[याच वेळी दृश्य स्थिर होते. स्टिल.
झोपलेल्या मोहनच्या निष्पाप चेहऱ्यावर प्रकाशझोत येतो...
आणि पडदा पडत असतो.]

म. ग्रं. [illegible] ठाणे, वाचनालय [illegible]
[illegible] २३५५८ [illegible] २६।५।९१
[illegible] [illegible] ..................

IRBK-0123779

IRBK-0123779